INDIAN SCHOOL ... CAL ECONOMY
5/5/03
LIBRARY

# अर्थबोधपत्रिका

आपल्या आजूबाजूस घडणाऱ्या विविध घटनांचा
'अर्थ'बोध करून देणारे मासिक

३ ● अमेरिकेने उडविलेला तेलाचा युद्धभडका
९ ● युद्धाचा जमाखर्च
११ ● ग्रेटर चीन : एक सुवर्णसंधी
१६ ● जर्मनीला हवी लोकसंख्येत वाढ !
१८ ● व्यापार संघटना व लघुउद्योग
२२ ● शास्त्रीय संगीत
२४ ● शांततेच्या पाऊलखुणा
२९ ● जगाच्या पाठीवर...
३२ ● कालप्रवाहात....

खंड २ : अंक २ मे २००३

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

# 'अर्थबोधपत्रिके'तील माहिती कशी ?

# जी सहज चाळता येईल अशी !

◆भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेचे "अर्थबोधपत्रिका" हे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व राजकीय विषयांवरील माहितीपूर्ण लेख देणारे प्रकाशन. ◆मराठी वाचकांना विविध विषयांवर अभ्यासपूर्ण माहिती देणे आणि एखाद्या विषयाच्या सर्व बाजू निष्पक्षपणे व सोप्या शब्दांत देणे, हे या मासिकाचे उद्देश. ◆अनेक विषयांवरील सखोल माहिती व विश्लेषणात्मक लेख प्रसिद्ध करणारी जी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरची इंग्रजी भाषेतील नियतकालिके, पुस्तके व इंटरनेटसारखी माध्यमे आहेत, व ज्यांतील माहिती एरवी मराठी वाचकांपर्यंत सहजतेने पोचत नाही, अशी माहिती मराठी वाचकांपर्यंत पोचविण्याचा हा प्रयत्न. ◆या अंकातील मजकुराबाबत आपण आपल्या सूचना आणि/किंवा अभिप्राय संस्थेच्या पत्यावर पाठवावेत अशी आपणास विनंती आहे. ◆अंकातील मजकूर आपण आपल्या नियतकालिकात / वृत्तपत्रात प्रसिद्ध करू शकता. लेख प्रसिद्ध केल्यावर त्याखाली **'अर्थबोधपत्रिका, भारतीय अर्थविज्ञानवर्धिनीच्या सौजन्याने'** अशी ओळ प्रसिद्ध करावी एवढीच अपेक्षा आहे. ◆लेख प्रसिद्ध झाल्यावर संस्थेतर्फे कोणतेही मूल्य आकारण्यात येणार नाही. मात्र लेख प्रसिद्ध केलेला अंक संस्थेला पाठविणे अत्यावश्यक आहे. ◆अंक मिळविण्यासाठी वार्षिक वर्गणी १००रुपये (परदेशस्थ वाचकांसाठी $२०) डिमांड ड्राफ्ट / मनीऑर्डर / पोस्टल ऑर्डर / चेकने किंवा रोख **'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' या नावे** पाठवावी. त्याबरोबर नाव व संपूर्ण पत्ता पिनकोडसह कळवावा. यासंबंधीचा अर्ज अंकात शेवटच्या पानात देण्यात आला आहे.

**अर्थबोधपत्रिका : खंड २ (अंक २ ) : मे २००३**

**संपादक** - रमेश पानसे, **संपादन सहाय्यक** - राज्यश्री क्षीरसागर

**पत्रव्यवहारासाठी पत्ता :** संपादक / व्यवस्थापक, अर्थबोधपत्रिका,

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी, अर्थबोध, ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, (रत्ना हॉस्पिटल जवळ) पुणे ४११ ०१६.

फोन : ५६५७१३२ ई-मेल : ispe@vsnl.com

: ५६५७२१० फॅक्स : ५६५७६९७

# संपादकीय

INDIAN SCHOOL OF POLITICAL ECONOMY LIBRARY

इराकचे युद्ध अमेरिकेच्या हट्टीपणाने आणि जगभरच्या युद्धविरोधी नि अमेरिकाविरोधी आंदोलनांनी गाजले. अमेरिकेच्या युद्धाच्या हट्टामागची अनेक कारणे, वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न या अंकात करण्यात आला आहे. युद्ध संपले तरी अमेरिकेची युद्धगिरी संपणारी नाही, हे या विषयांवरील लेखातून वाचकांच्या ध्यानी येईल.

युद्धामुळे वाढणारे ताण शांततेच्या गरजेची जाण अधिक वाढवतात असा अनुभव प्रत्ययी येतो. जगाच्या पटलावर, युद्धांइतके प्रखर नसले तरी काही प्रभावी प्रयत्न, शांततेच्या मार्गाने जग जावे यासाठी होतच असतात. अर्थबोधपत्रिकेने, मागील अंकापासून, अशा प्रयत्नांचा वेध घेण्यासाठी 'शांततेच्या पाऊलखुणा' असे एक नवे सदर सुरू केले आहे. या अंकात, नोबेल शांतता पुरस्काराने सन्मानित झालेल्या महनीय व्यक्ती यासंदर्भात काय भूमिका मांडतात, ते देण्यात आले आहे.

या अंकात शास्त्रीय संगीताच्या संदर्भातील वास्तव परिस्थितीची जाण देणारा लेख छापला आहे. एकूणच युद्ध-हिंसेच्या सततच्या प्रत्यक्षातील घटना आणि टीव्ही व अन्य माध्यमांतून येणाऱ्या अशाच प्रक्षोभक काल्पनिक घटनांमुळे जशी एकीकडे माणसांची संवेदनशीलताच कमी होत असल्याची भावना होत आहे, तद्वतच अभिजात कलांमधील, शाश्वत आनंद देणाऱ्या सखोलतेच्या अनुभवांचेही अवमूल्यन होत आहे, असे दिसते. जीवनाच्या क्षणभंगूरतेच्या जाणीवेने, माणूस तात्काल आनंद देणाऱ्या उडत्या कलाविष्कारांकडे तर वळत नाही ना ? तसे असेल तर खरोखरच ही घटना गंभीर आहे. अभिजात कला या माणसाला शाश्वत विश्वास देत असतात. त्यांचे हे कार्य मानवी संस्कृतीच्या कण्यासारखे आहे. हा कणा खिळखिळा होणे हे मानवी जीवनाला परवडणारे नाही, असाच काहीसा आशय शास्त्रीय संगीतावरील लेखाच्या अनुषंगाने आपल्यापुढे येत आहे, असे वाटते. युद्ध-शांतता-अभिजात कला या त्रिकोणातील तीनही कोन परस्परसंबंधित आहेत, परस्परांवर परिणाम करणारे आहेत. वाचकांनी विचाराभिमुख व्हावे यासाठीच तीन्हींना या अंकात एकत्र आणण्याचा प्रयत्न केला आहे.

जर्मनी, जपान,चीन आणि भारत यांमधील विविध घटनांकडेही या अंकाने आपले लक्ष वेधण्याचे योजले आहे. ■■

# वाचकांचा प्रतिसाद

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड वाढावी व त्यांना वेगवेगळ्या नियतकालिकांमधून अनेक विषयांची ओळख व्हावी यासाठी सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय, मुरगूड, यांच्यातर्फे ज्ञानवाहिनी हा उपक्रम सुरू करण्यात आला असून त्यासाठी अर्थबोधपत्रिकेची निवड करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत आमच्या महाविद्यालयातील दोन विद्यार्थिनींना आपला अंक पाठवावा. त्यांची वर्गणी आम्ही विद्यालयातर्फे पाठविली आहे.

-ग्रंथपाल, सदाशिवराव मंडलिक महाविद्यालय,
मुरगूड,(तालुका कागल, जिल्हा कोल्हापूर)

उत्तर महाराष्ट्र विद्यापिठाच्या प्रौढ व निरंतर शिक्षण व विस्तार सेवा या विभागातर्फे स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन वर्ग सुरू करण्यात आले असून यात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून देण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी आपले अर्थबोधपत्रिका हे मासिक उपयुक्त ठरणार आहे. तरी ते नियमित पाठवावे. सोबत वर्गणी पाठविली आहे.

-प्रा. शांताराम बडगुजर, विभाग संचालक, जळगाव

अर्थबोधपत्रिकेतील (एप्रिल २००३) अमेरिका व इराक संबंधीचा आणि इतर लेख आवर्जून वाचले. पर्शियन आखातातील तेल साठ्यांवर डोळा ठेवून तो योजनाबद्धरीतीने हडप करण्याचे अमेरिकेचे प्रयत्न सतत चालूच असतात, ही वस्तुस्थिती आहे. फायनान्शियल टाइम्स विकएंडमधील एका लेखातूनही अशीच माहिती मिळते.

अमेरिकेची ही वृत्ती इराकमधील युद्धानंतर थांबेलच कशावरून ? आशिया खंडात जी अमाप नैसर्गिक संपदा आहे तीवर या शक्तीचा डोळा असू शकतो.

-डॉ. श्रीकांत परळकर, दादर, मुंबई

अर्थबोधपत्रिका आता मासिक झाल्याबद्दल शुभेच्छा ! त्यातील माहिती व लेख खरोखरच सामान्य माणसाला अनुपलब्ध अशी माहिती एकत्रपणे उपलब्ध करून देतात. जगातील विविध घटना व विचार प्रवाहांची ओळख होते. ती आता दरमहा होणार ही अधिकच आनंदाची बाब.

-दिलीप कुळकर्णी, कुडावळे, ता-दापोली

# अमेरिकेने उडविलेला तेलाचा युद्धभडका

अमेरिका आणि इराक यांच्यातील युद्धासाठी अमेरिकेला बरीच किंमत मोजावी लागली आहे, तरीही जगाचा रोष पत्करून अमेरिकेने हे युद्ध घडवून आणले असून एकट्या ब्रिटनने अमेरिकेला सर्वप्रकारे मदत केली आहे. अमेरिकेच्या या युद्धामागे इराकमधील तेलसाठे हेच एकमेव उद्दिष्ट असल्याचे मत अनेकांनी व्यक्त केले आहे.

'रॉयल युनायटेड सर्व्हिसेस इन्स्टिट्यूट' (RUSI) ही लंडनस्थित संस्था 'आंतरराष्ट्रीय सुरक्षा व संरक्षण' या विषयावर विशेष अभ्यास करणारी आणि या क्षेत्रात पथदर्शक मानली जाते. या संस्थेतील एका कार्यक्रमात अमेरिकेचे माजी अध्यक्ष रोनाल्ड रेगन यांचे सुरक्षा सल्लागार रॉबर्ट मॅकफर्लेन यांचे गेल्यावर्षी (ऑक्टोबर २००२) एक भाषण झाले. त्यावेळी त्यांनी असे सूचित केले होते की, "यापुढे अमेरिका आणि ब्रिटन यांची सुरक्षा ही, त्या देशांकडे किती लष्करी सामर्थ्य आहे व ते वाढविण्याची त्यांची किती क्षमता आहे यापेक्षा, त्यांची ऊर्जाविषयक क्षमता आणि देशांतर्गत तेलविषयक अर्थव्यवहार यांवर जास्त अवलंबून राहील. देशांतील तेलाची मागणी कमी करत नेणे यावर, आता लक्ष केंद्रित करावे लागेल. कारण, तेलाच्या पुरवठ्यावर अवलंबून राहणे हे पुरेसे ठरणार नाही." एकेकाळी याच मॅकफर्लेन यांनी अमेरिकेच्या अध्यक्षांचे निवासस्थान असलेल्या 'व्हाईट हाऊस' वरील सौरऊर्जेचे पॅनेल काढून टाकणाऱ्यांबरोबर सहकार्य केले होते. सुरक्षाविषयक अनेक उच्चपदस्थ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत झालेल्या या चर्चेत, मानवाधिकार, पर्यावरणविषयक किंवा ऊर्जाविषयक इतर कोणतेही प्रश्न नव्हते. केवळ 'तेल आणि या दोन देशांची सुरक्षा' यांवरच चर्चा केंद्रित झाली होती.

## 'तेल'/कट/राजकारण

'तेल आणि सुरक्षा' हाच विषय अमेरिकेचे सध्याचे राष्ट्राध्यक्ष बुश यांच्या प्रशासनाने लावून धरला आहे. केवळ मध्य आशियातीलच नव्हे तर संपूर्ण जगातील तेलसाठे हा अमेरिकेच्या सध्याच्या प्रशासनासाठी जिव्हाळ्याचा विषय आहे. इराकवरील अमेरिकेचे आक्रमण आणि सध्याचे तेलाचे राजकारण लक्षात येण्यासाठी भूगर्भविज्ञान आणि तेलउद्योग हे थोडक्यात समजून घेण्याची गरज आहे. एक म्हणजे, जगातील

तेलसाठे लगेचच संपुष्टात येतील अशी परिस्थिती नाही; उलट, गेल्या २५ वर्षांत जगभरातील तेलसाठ्यांचे प्रमाण सुमारे ७० टक्क्यांनी वाढलेले आहे. तेलाच्या नवीन साठ्यांचा शोध घेणे अगदी लगेचच थांबविले तरीही, तेलाच्या विहिरी पुढील ४० वर्षे कोरड्या पडणार नाहीत एवढे तेल सध्या त्यात आहे.

भूगर्भात किती तेल आहे यावरच केवळ उपलब्ध तेलाचे प्रमाण अवलंबून नाही तर त्यामागील अर्थकारण, राजकारण व नवतंत्रज्ञान हेही तेवढेच महत्त्वाचे आहे. जमिनीत तेल असले तरी ते योग्य तंत्रज्ञानाशिवाय काढताच येत नाही. भूगर्भातील तेलाची पातळी योग्य पद्धतीने मोजणे, तेलाचे साठे कुठेकुठे आहेत ते शोधणे आणि नवतंत्रज्ञान व साधनसामग्री वापरून ते मिळविणे याला गेल्या काही वर्षांमध्ये महत्त्व आले आहे. भविष्यात कुठल्या तेलसाठ्यांमधून किती तेल उपलब्ध होऊ शकेल याचेही योग्य अंदाज बांधणे, नवीन तंत्रज्ञानामुळे शक्य होऊ लागले आहे.

तेलाच्या किंमतींनाही अनिवार्य असे महत्त्व आहे. तेलाच्या किंमती वाढल्या की जास्त खर्च करून छोट्या तेलसाठ्यांवरही तेल मिळविणे शक्य होते. आंतरराष्ट्रीय राजकीय, आर्थिक परिस्थितीनुसार, तेलाचे साठे असलेले देश किंवा कंपन्या, तेलाच्या साठ्यांबाबत वा किंमतींबाबत वेगवेगळी विधाने करून संबंधितांना आणखी बुचकाळ्यात टाकत असतात. 'रॉयल इन्स्टिट्यूट ऑफ इंटरनॅशनल अफेअर्स' या संस्थेने अलीकडेच प्रसिद्ध केलेल्या 'द न्यू इकॉनॉमी ऑफ ऑईल' या अभ्यासात म्हटले आहे की, "सध्याचे तेलाचे साठे म्हणजे हिमनगाचे एक टोक आहे. हे साठे पाण्याखाली अजून किती आहेत, याचा काही अंदाज करणे कठीणच आहे. तेलाच्या किंमती जसजशा वाढतील आणि नवीन तंत्रज्ञान जसजसे प्रगत होत जाईल, तसतशी या हिमनगाची व्याप्ती आपल्याला लक्षात येईल."

पाण्याखालील नवीन साठ्यांचा शोध घेण्यात येत असला तरी सध्याच्या परिस्थितीत जमिनीखाली उपलब्ध असणाऱ्या तेलसाठ्यांपैकी सर्वात जास्त तेलसाठे हे पर्शियातील आखातात आहेत, त्यामुळे जगाची नजर या आखाताकडेच आहे. त्यातही सौदी अरेबियाकडे सुमारे २५ % तेलाचे साठे आहेत. अमेरिकेने व्हेनेझुएला, मेक्सिको आणि कॅनडा या राष्ट्रांमधून तेल आयात केले असले तरी अमेरिकेची खरी गरज सौदी अरेबियातील तेलसाठेच पूर्ण करतात. सौदी अरेबियाची सध्याची तेल उत्पादनाची क्षमता ८० लाख बॅरल प्रतिदिन एवढी आहे. भविष्यात, तेथेही फार मोठ्या प्रमाणावर आणखी तेलाचे साठे सापडतील, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे.

याशिवाय काही गरज निर्माण झाल्यास, अतिशय कमी वेळात दर दिवशी अतिरिक्त २० लाख बॅरल तेल उत्पादन करण्याची क्षमता या देशाकडे आहे. उदाहरणार्थ, या वर्षाच्या सुरूवातीलाच व्हेनेझुएलातील तेलाच्या कंपनीत संप झाल्याने, तेलाच्या व्यापारात निर्माण झालेली तूट, एकट्या सौदी अरेबियाने भरून काढली. त्यामुळे अमेरिकेचे राजकारण व लष्करविषयक धोरणे ही सौदी अरेबिया व तेलसाठे यांभोवती फिरत असतात.

पॅलेस्टाईन-इस्त्रायल यांच्या संघर्षात, अमेरिकेने इस्त्रायलच्या लष्कराला मदत केल्यानंतर सौदी अरेबियाने व इतर आखाती देशांनी अमेरिकेला तेल न देण्याचे धोरण अवलंबिले (१९७३) तेव्हा अमेरिकेची अडचण झाली होती. तेव्हापासूनच अमेरिका तेलविषयक धोरणाबाबत फार जागरूक झाली आहे. यानंतर १९८०मध्ये इराणमध्ये झालेल्या क्रांतीनंतर तसेच विघटनापूर्वीच्या सोव्हिएट रशियाने अफगाणिस्तानवर आक्रमण केल्यानंतर, अमेरिकेने तेलाची सुरक्षा या विषयाला सर्वाधिक प्राधान्य दिले आहे. आखाती देशांवर अमेरिकेचा तेव्हापासूनच डोळा आहे. आखाती देशांवर इतर कोणीही कब्जा करण्याचा प्रयत्न केल्यास अमेरिकेचे हितसंबंध लक्षात घेऊन अमेरिका सर्वप्रकारे, अगदी लष्करी मार्गाने देखील, आपल्या हितसंबंधांचे रक्षण करेल, असे अमेरिकेच्या अध्यक्षांनी म्हणून ठेवले होते. त्यानंतर तेलाची सुरक्षा हा विषय लक्षात घेऊन अमेरिकेने सैन्याची विशेष जमवाजमव सुरू केली होती. रोनाल्ड रेगन यांनी अध्यक्षपदाचा कारभार हाती घेईतोपर्यंत १९८३मध्ये अमेरिकेचे लष्कर, नौदल व वायूदल तेलाच्या लढाईसाठी बऱ्याच प्रमाणात सज्ज झाले होते. आता, यानंतर वीस वर्षांनी हे सैन्य इराकच्या भूमीवर युद्ध करण्यास उतरले आहे.

<u>तेलाचे साठे व अमेरिकेचे परदेशांतील लष्कर</u>

तेलाच्या साठ्यांबाबत अमेरिका किती जागरूक आहे ते, पुढील मुद्यांवरून स्पष्ट होईल. ●सोमालियामध्ये १९९१मध्ये अमेरिकेचे समर्थक असलेले अध्यक्ष मोहम्मद सियाद बारी यांना पदच्यूत करण्यात येण्यापूर्वी काही महिने आधीच सोमालियातील दोन-तृतीयांश भागाला म्हणजे तेलउत्पादक प्रदेशांना विशेष सवलती देण्यात आल्या होत्या. कोनोको भागातील मोगाडिशू कॉर्पोरेटची जागा तर, जॉर्ज बुश (सिनियर) प्रशासनांतील विशेष दूतांना वापरण्यासाठी अमेरिकेच्या दूतावासाच्या हाती सोपविण्यात आली होती. ● कोलंबिया, व्हेनेझुएला आणि इक्वाडोर या भागांमधून अमेरिकेला तेल पुरविण्यात येते. त्यामुळे कोलंबियातील नागरी युद्धात अमेरिकेचा सहभाग होता, असा

जाणकारांचा अंदाज आहे. पेट्रोलियमच्या पाईपलाईनचे (तेलवाहिनी) संरक्षण करण्याचे प्रशिक्षण कोलंबियातील नागरिकांना देण्यासाठी अमेरिकेने २००२ या वर्षी ९ कोटी ८० लाख डॉलर्स एवढा खर्च केला. यासाठी ६० ते १०० विशेष तुकड्याही तेथे तैनात केल्या. ● कॅस्पियन समुद्रानजीकच्या भागांतून मोठ्या प्रमाणावर तेल मिळू शकते, म्हणून दहशतवाद संपवून तेथे तेलवाहिन्या टाकण्यावर अमेरिकेचा जोर आहे. (यासंबंधीची सविस्तर माहिती अर्थबोधपत्रिकेच्या खंड १ अंक ६, जानेवारी-फेब्रुवारी २००३ मध्ये, पृष्ठ क्रमांक ४ वर, 'तेलाचे साठे, आणि नेतृत्वासाठी अमेरिकेची व्यूहरचना' या लेखात प्रसिद्ध करण्यात आली आहे.) ● अमेरिकेने जॉर्जियाला फेब्रुवारी २००१ मध्ये लष्करविषयक तयारीसाठी ६ कोटी ४०लाख डॉलर्सची मदत देण्याचे मान्य केले. तसेच जॉर्जियातील लष्कराला दहशतवादविरोधी प्रशिक्षण देण्यासाठी विशेष तुकड्याही तैनात केल्या. यानंतर जॉर्जियाच्या संरक्षणमंत्र्यांनी, 'अमेरिकेच्या प्रशिक्षणामुळे बाकू -सेहन या पाईपलाईनचे रक्षण होऊ शकेल' असे विधान केल्याचे वृत्तसंस्थांनी म्हटले होते.

● अमेरिकेच्या प्रशासनात व बुश यांच्या नजीकच्या वर्तुळात सध्या महत्त्वाचे स्थान मिळविलेले उपाध्यक्ष डिक चेनी हे पूर्वी तेल कंपन्यांमध्ये उच्चपदी कार्यरत होते. त्यांच्या काळात, १९९७ मध्ये बी.पी. आणि हॅलिबर्टन या कंपन्यांनी, कॅस्पियन भागातील तेल मिळविण्यासाठी ट्रान्सबाल्कन पाईपलाईनचा प्रस्ताव सुचविला होता. हे तेल टँकरमधून अल्बानियातील बंदरामार्गे अमेरिकेला आणता येणार होते. यानंतर दोन वर्षांनी अमेरिकेच्या सैनिकांनी कोसावोच्या दक्षिण भागात कॅम्प बाँडस्टील हा तळ उभारला. व्हिएटनामच्या युद्धानंतर अमेरिकेने देशाबाहेर उभारलेला हा सर्वात मोठा लष्करी तळ होय. २००२च्या डिसेंबर महिन्यात, एक्सॉनमोबिल आणि शेवरॉन टेक्साको या तेल -कंपन्यांनी, ट्रान्स बाल्कन पाईपलाईनच्या प्रकल्पात सहभागी होण्याची तयारी दर्शविली. ●दक्षिण आफ्रिकेतील अंगोला ते नायजेरिया या भागात मोठ्या प्रमाणावर तेलाचे साठे असून त्यापैकी १५ टक्के तेल हे अमेरिकेकडे सध्या निर्यात करण्यात येते. ही टक्केवारी लवकरच २५% होईल अशी शक्यता आहे. या तेलसाठ्यांवर नजर ठेवून अमेरिकेचा साओ टोम या बेटानजीक आणि प्रिन्सिपी या भागात नौदलाचा तळ उभारण्याचा विचार नक्की झाला आहे, असे साओ टोमचे अध्यक्ष फ्रेडिक डी मेनेझेस यांनी सांगितले आहे. मात्र अमेरिकेच्या परराष्ट्र खात्याने यासंबंधी कोणतीही प्रतिक्रिया वृत्तपत्रांमधून व्यक्त केलेली नाही.

## तेलाची सुरक्षा आणि इराकमधील युद्ध

अमेरिकेच्या सध्याच्या प्रशासनाचे अंतिम उद्दिष्ट हे तेलाच्या पुरवठ्यामागील सुरक्षा हेच आहे. पण त्याही कितीतरी आधीपासून, म्हणजे फ्रँकलिन रूझव्हेल्ट यांच्या काळापासून अमेरिकेची तेलावर नजर आहे. यासंदर्भात डॅनियल यर्गिन यांनी 'फायनान्शियल टाइम्स'मधून काही विचार मांडले आहेत. (यर्गिन यांना 'वर्ल्ड ऑइल इंडस्ट्री' या विषयाचा ऐतिहासिक अभ्यास केल्याबद्दल मानाचा समजला जाणारा पुलित्झर पुरस्कार मिळाला होता.) ते म्हणतात, 'दुसऱ्या महायुद्धाच्या काळातच रूझव्हेल्ट यांनी एव्हरेट-ली-द-गॉलियर् या प्रसिद्ध भूगर्भशास्त्रज्ञाला मध्य आशियातील तेलसाठ्यांबाबत अभ्यास करण्यास पाठविले होते. त्यापूर्वी म्हणजे १९२७मध्ये इराकच्या कुर्डिश भागात, किर्कुक येथे तेलाचे साठे सापडले होते. अरब देशांतील तेलाचा व्यापार तेव्हापासून सुरू झाला, असे म्हटले जाते. त्यानंतर १९३८ मध्ये सौदी अरेबिया व कुवैत येथेही तेलाचे साठे आढळले. हे तेलाचे साठे भविष्यात अतिशय महत्त्वाचे ठरणार आहेत हे, अमेरिका, रशिया, ब्रिटन, जर्मनी या सर्वच देशांच्या लक्षात दुसऱ्या महायुद्धाच्या काळापासूनच आले. या काळातील गॉलियर् यांचा अभ्यास असे सांगतो की, तेलाचे साठे व पृथ्वीची गुरूत्वाकर्षण शक्ती यांच्यातील संबंधांमुळे यापुढे तेलाचे साठे मध्य आशियात, पर्शियन आखातात जास्त प्रमाणात सापडतील. पण तेलाचे साठे नुसते सापडून उपयोगी नाही तर त्यासाठी नवे तंत्रज्ञानही अत्यावश्यक ठरते आहे. गेल्या काही वर्षांमध्ये तेलाची मागणी वाढली असूनही इंराण व इराक येथील तेलाचे उत्पादन कमी झाले आहे. फक्त सौदी अरेबियाने मात्र नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून तेलाच्या उत्पादनात बाजी मारली आहे.

सौदी अरेबियानंतर सर्वात मोठा तेलाचा साठा इराकच्या भूगर्भात दडलेला आहे. खरे तर, अमेरिकेला सौदी अरेबियाचे तेलसाठ्यांवरील वर्चस्वही मोडून काढायचे आहे. कारण, अमेरिकेच्या वर्ल्ड ट्रेड सेंटर व पेन्टॅगॉनवर हल्ले करणारे अल्-कायदाचे बरेचसे अतिरेकी, सौदी अरेबियाचे नागरिक होते. पण सध्या अमेरिका, 'तेला'मुळे सौदी अरेबियाशी शत्रुत्व ओढवून घेऊ इच्छित नाही. उलट इराकवर युद्ध लादायला त्यांना, अनायसेच सद्दाम हुसेनची हुकुमशाही आणि इराकी जनतेची गळचेपी ही कारणे मिळाली. त्यातच इराककडे असू शकणारी जैविक व रासायनिक अस्त्रे आणि सद्दाम व अल्-कायदा यांचे संबंध, हे विषय देखील जोडले गेले. सद्दाम

पदच्यूत झाल्यानंतर इराकवर अप्रत्यक्षपणे अमेरिकेचे वर्चस्व असेल. मग, अमेरिकेला सौदी अरेबियालाही शह देता येणार आहे आणि मध्य आशियातील तेलसाठ्यांवर वर्चस्व मिळवून चीन, पाकिस्तान, कोरिया या राष्ट्रांवरही 'विशेष लक्ष ' ठेवता येणार आहे.

अमेरिकेला तेलसाठ्यांवर आपलेच वर्चस्व का हवे आहे याचे आणखी एक आर्थिक कारण आहे. भूगर्भातून तेल किती व कुणाच्या मदतीने आणि केव्हा बाहेर काढायचे हा निर्णय, तेल उत्पादक देशांच्या नेतृत्वाच्या हातात असतो. सध्या जगात तेलाची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढते आहे. अशा परिस्थितीत इतर देशांना भरमसाठ पैसे द्यायला लावून (पेट्रोडॉलर्स मिळवून) अप्रत्यक्ष रीतीने आपल्या हाती जगाची सूत्रे ठेवायची, असा डाव सद्दामसारखे नेते खेळू शकतात, असाही एक अंदाज आहे. शिवाय या पेट्रोडॉलर्समधून जग नष्ट करू शकणारी जैविक, रासायनिक अस्त्रे तयार करून तीही आपल्या हाती ठेवायची, असे राजकारण हे अतिशय धोकादायक ठरू शकते. अल्-कायदा आणि सद्दाम हुसेन हे दोघेही अमेरिकेच्या विरोधात एकत्र येऊ शकतात आणि तेलसाठ्यांचा दुरूपयोग करू शकतात अशीही एक शंका व्यक्त केली जाते. तसे झाले तर ते अमेरिकेसाठी तर धोक्याचे आहेच, शिवाय जागतिक अर्थव्यवस्थेला आणि इतर देशांनाही धोक्याचे ठरू शकते.

इराकचे सर्वेसर्वा सद्दाम हुसेन हे अमेरिकेचे वर्चस्व न मानणारे आहेत. इराकचे तेलसाठे अमेरिकेच्या ताब्यात जाऊ देण्याची त्यांची तयारी नाही. मुस्लिम दहशतवादाला त्यांचा पाठिंबा आहे किंवा नाही हे अद्याप सिद्ध होऊ शकलेले नाही. तसेच इराकजवळ असू शकणारी अस्त्रे ही त्यांना अमेरिकेच्या विरोधात वापरायची होतीच, असेही सिद्ध झाले नाही. पण सद्दाम हे अमेरिकेला उघडपणे विरोध करतात म्हणून ते दहशतवादाला छुपा पाठिंबा देतील, असे अमेरिकेला वाटते. यात काहीच तथ्य नाही, असेही नाही. शेवटी युद्धाला काहीतरी कारण तर हवेच असते. जैविक व रासायनिक अस्त्रे तयार करण्यापेक्षाही सद्दाम यांनी एक चूक केली. ती म्हणजे, अलीकडेच अमेरिकेच्या इराक -जॉर्डनमार्गे तयार होऊ शकणाऱ्या पाईपलाईनला त्यांनी विरोध केला. मग इराकवर हल्ले सुरू झाले, असे समजते. ■■

*(संदर्भ- इंटरनेट, वॉशिंग्टन येथील ऊर्जा व पर्यावरण विषयक अभ्यासगटाने लिहिलेला विशेष लेख, फायनान्शियल टाइम्स-वीकएन्ड, २२/२३मार्च २००३)*

# युद्धाचा जमाखर्च

अमेरिकेने इराकवर युद्ध लादले असून त्याचा खर्च अब्जावधी डॉलर्समध्ये होतो आहे. एवढा मोठा खर्च सोसून अमेरिकेने हे युद्ध का घडवून आणले ? याचे राजकीय नव्हे तर गणितीय उत्तर शोधण्याचा प्रयत्न काहींनी केला आहे. यासाठी १९९१ मधील आखाती युद्धाचा आधार घेण्यात आला आहे. हे गणितीय उत्तर ई-मेलने जगात पसरविले जात आहे. ते असे : ●आखाती युद्धाचा खर्च ४०० अब्ज अमेरिकन डॉलर्स आला. हा खर्च कोणी सोसला तर अमेरिकेने, असे आपण चटकन् म्हणू. पण हे अर्धसत्य आहे. म्हणजे प्रत्यक्षात असे घडले की, या खर्चापैकी फक्त २५% खर्चच अमेरिकेने सोसला. ७५% खर्च हा सौदी अरेबिया आणि कुवैत या देशांनी केला आहे. ●हा पैसा कुठून आला ? आखाती युद्ध सुरू होण्यापूर्वी तेलाचे भाव १५ डॉलर्स प्रति बॅरल होते. युद्ध सुरू झाल्यावर हाच भाव ४२ डॉलर्स प्रति बॅरल एवढा वाढला. त्यामुळे सुमारे ६० अब्ज डॉलर्सचा नफा वाढला. हा नफा कोणाला मिळाला ? अरब देशांनी आणि तेल उत्पादक कंपन्यांनी तो अर्धा-अर्धा वाटून घेतला. त्यामुळे सौदी अरेबिया आणि कुवैतमधील सरकारांना ३० अब्ज डॉलर्स मिळाले तर तेल उत्पादक बहुराष्ट्रीय कंपन्यांना ३० अब्ज डॉलर्स मिळाले. ●मध्य आखातातील या तेल उत्पादक कंपन्या कुणाच्या आहेत ? तर सात अमेरिकेच्या (शेल, टॅमॉईल आणि इतर) आणि पाच कंपन्या अमेरिकन सरकारच्या अखत्यारीतील आहेत. म्हणजे तेल उत्पादक कंपन्यांना जो ३० अब्ज डॉलर्सचा नफा झाला त्यातील, अंदाजे २१ अब्ज डॉलर्स अमेरिकेच्या सरकारला आणि ९ अब्ज डॉलर्स अमेरिकेतील खाजगी क्षेत्राला मिळाले असे समजू. आता खालील तक्ता काळजीपूर्वक पाहावा. (आकडेवारी अब्ज डॉलर्स)

| | युद्धाचा खर्च | तेलाचे भाव वाढल्याने झालेला नफा | नफा /तोटा |
|---|---|---|---|
| अरब देश | ३० | ३० | काही नाही |
| अमेरिकेचे सरकार | १० | २१ | (नफा) ११ |
| अमेरिकेचे खाजगी क्षेत्र | काही नाही | ९ | (नफा) ९ |

आता असे स्पष्ट होते की युद्धामुळे अमेरिकेला एकूण (११+९) २० अब्ज डॉलर्सचा फायदा झाला. कुवैतच्या स्वातंत्र्याचा आणि या नफ्याचा संबंध मांडला जातो तो असा. पण हे एवढेच गणित पुरेसे नाही. अमेरिकेला हा नफा कोणी मिळवून दिला ? तर तेल वापरणाऱ्या आपण सर्वांनीच !!

दुसरे म्हणजे अमेरिकेने या युद्धात आणि युद्धानंतर इतर देशांना विकलेल्या शस्त्रांच्या माध्यमातून ४९ अब्ज डॉलर्स नफा मिळविला.

●म्हणजे आखाती युद्ध हे केवळ पैसा मिळविण्यासाठी झाले. मानवाधिकार आणि कुवैतचे स्वातंत्र्य हे मुद्दे गौणच ठरले.

●या पार्श्वभूमीवर अमेरिकेने अफगाणिस्तानवर आणि आता इराकवर केलेला हल्ला आपल्याला समजून घेता येईल.

●अमेरिकेला अफगाणिस्तानमधील अमेरिकेचे न ऐकणारे सरकार हटवायचे होते आणि अमेरिकेचे ऐकणारे सरकार हवे होते; कारण अफगाणिस्तानमधून जाणारी, पण अमेरिकेच्या मालकीची तेलाची पाईपलाईन त्यांना टाकायची होती. ही पाईपलाईन (दुसऱ्या देशात टाकण्यासाठी) त्यांना जो कर द्यावा लागतो तो फार मोठा होता व अमेरिकेला तो टाळायचा होता.

●आता देखील इराकवर अमेरिकेने लादलेले युद्ध हे तेलसाठ्यांवर वर्चस्व मिळविण्यासाठी आणि ओसामा बिन लादेनच्या सौदी अरेबियाला शह देण्यासाठीच आहे.

●हा सर्व खटाटोप इराकसाठीच का ? तर, इराक अमेरिकेला प्रत्युत्तर देण्याच्या आर्थिक, लष्करी तयारीतच नाही. शिवाय सद्दाम हुसेन हुकुमशहा असल्याने लोकशाही प्रस्थापित करण्याचाही मुद्दा पुढे आणता येतो. इराककडे शस्त्रास्त्रे आहेत, असेही कारण अमेरिकेला सांगता येते.

●आणखी एक कारण म्हणजे, अमेरिकेला लॅटिन अमेरिकेतील व्हेनेझुएला कडून तेल आयात करता येते. पण तेथील लोक आता जागरूक होऊ लागले आहेत. समजा तेथून तेल मिळाले नाही तर....

●खरे तर, आखाती युद्धाचा अनुभव घेतलेला इराक अमेरिकेला डोईजड होण्याची शक्यता नव्हतीच. पण...

तेलाचे साठे तेथे आहेत त्याला काय करणार ?

■■

आर्थिक

# 'ग्रेटर चीन': एक सुवर्णसंधी

आंतरराष्ट्रीय संबंधांचा विचार करताना, विसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत, अनेक राष्ट्रांनी चीनबरोबर फारसे संबंध वाढविले नाहीत आणि चीनने देखील इतर राष्ट्रांबरोबर फारशी मैत्री केली नाही. पण नव्या शतकाच्या सुरूवातीस, चीनने हळूहळू खुल्या व्यापाराकडे जाण्यासाठी पावले उचलली व जागतिक व्यापारसंघटनेत चीनचा प्रवेश निश्चित झाला. त्यातच चीनने आपण केवळ लष्करी सामर्थ्याला महत्त्व देत नाही, तर बदलत्या अर्थ व समाजव्यवस्थेत चीनला सर्व देशांशी चांगले संबंध ठेवण्यात रस आहे, हेही जगाच्या नजरेस आणून दिले. चीनबरोबरचे संबंध म्हणजे व्यापारासाठी एक सुवर्णसंधी आहे, हे चीनने इतर देशांना पटविले. अलीकडे, चीनमधील वाढलेल्या परकीय गुंतवणुकीचे प्रमाण पाहता, चीन स्वत:बद्दलचे जगाचे मत बदलण्यात यशस्वी झाला असल्याचे दिसते.

गेल्या दोन-तीन वर्षांच्या काळात, जागतिक अर्थव्यवस्था अडचणीत येऊन आर्थिक क्षेत्रात काळजीचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, याच काळातील चीनमधील आर्थिक वाढीमुळे जागतिक अर्थव्यवस्थेला उभारी मिळत आहे, असे मत चीनमधील अर्थतज्ज्ञ हू अॅनगँग यांनी व्यक्त केले आहे. चीनने गेल्या दोन वर्षात काही मोठे प्रकल्प व योजना आखल्या आहेत. झिनजियांगपासून शांघायपर्यंत नैसर्गिक वायू वाहून नेण्याकरिता एक मोठी पाईपलाईन टाकण्यासाठी चीनने, रॉयल डच अँड शेल ग्रुप, एक्सॉन मोबिल कार्पोरेशन आणि रशियातील मोठी कंपनी गॅझप्रॉम यांची मदत घेतली आहे. या प्रकल्पाची किंमत १४० अब्ज युवान म्हणजे सुमारे १७अब्ज अमेरिकन डॉलर्स एवढी आहे.

इ.स.२००८मध्ये चीनमध्ये ऑलिम्पिक स्पर्धा होणार आहेत. त्याचे नियोजन व बांधकाम करण्यासाठी चीनने जागतिक पातळीवर निविदा मागविल्या आहेत. यासंबंधीचे कायदेशीर व कागदोपत्री व्यवहार सुलभ करण्यासाठी चीनने आवश्यक ते बदल करण्यास सुरूवात केली आहे. चीनमधील यांगत्झे नदीचे पाणी वळवून ते इतर प्रांतांना पुरविण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. याशिवाय विमानतळ, रेल्वेस्थानक आणि रस्त्यांचे बांधकाम या क्षेत्रांतही परदेशांतील कंपन्यांना गुंतवणूक करण्यास चांगली संधी आहे, असे हू अॅनगँग म्हणतात. चीनमधील प्रकल्पांमुळे चीनला भौगोलिकदृष्ट्या जवळ असलेल्या देशांचाही फायदा झाला आहे. ऑस्ट्रेलिया आणि इंडोनेशिया या देशांनीही चीनबरोबर

मोठे व्यापारी करार केले आहेत. 'एसिआन' मधील देशांची चीनमधील निर्यात २७ टक्क्यांनी वाढली आहे.

याचबरोबर चीनमधील उद्योजकांनी, देशाबाहेर जाऊन आपला व्यापार वाढवावा, यासाठीही चीनमधील सरकार विशेष प्रोत्साहन देत आहे. २०२० पर्यंत आर्थिक क्षेत्रात भरीव कामगिरी करण्याचे उद्दिष्ट चीनच्या सरकारने डोळ्यापुढे ठेवले आहे.

पूर्व आशियातील आर्थिक संकटाच्या वेळी, देशांतर्गत दबाव असतानाही चीनने आपल्या चलनाचे (युवानचे) अवमूल्यन न करता प्रादेशिक आर्थिक स्थैर्य कायम राखले. इतर देश आधीच अडचणीत असताना, आपण चलनाचे अवमूल्यन करून त्या देशांची अडचण गंभीर करायची नाही, असे चीनचे तेव्हाचे धोरण होते आणि चीनच्या या भूमिकेची इतर देशांमध्ये खूप प्रशंसा झाली. अफगाणिस्तानातील युद्धानंतर चीनने अफगाणिस्तानला मदत करून आपण यातही मागे नाही, हे जगाला दाखवून दिले.


'ग्रेटर चीन'

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात चीनची अशी आगेकूच चालू असताना आणखी एका बाबीमुळे चीनने जगाचे लक्ष आकर्षित केले. ते म्हणजे 'ग्रेटर चीन' होय. 'ग्रेटर चीन' म्हणजे तैवान आणि हाँगकाँगचा सक्रिय आर्थिक सहभाग असलेला चीन. साधारणपणे १९८०च्या दशकापासून ही कल्पना पुढे येत आहे. चीनने आपले बंदिस्त दरवाजे उघडल्यानंतर आणि हाँगकाँगचा प्रदेश चीनच्या ताब्यात आल्यानंतर हाँगकाँग व तैवान येथील उत्पादकांनी चीनच्या दक्षिण भागात मोठ्या प्रमाणावर शिरकाव केला. जागतिक व्यापार संघटनेत चीनचा प्रवेश नक्की झाल्यानंतर तैवान, हाँगकाँग आणि चीन येथील औद्योगिक एकीकरण फार वेगाने होऊ लागले.

गुंतवणुकीसाठी आवश्यक असणाऱ्या राजकीय प्रक्रियांमधील अडसर बाजूला सारून येथील प्रशासकीय अधिकाऱ्यांमध्ये आपापसात चर्चा होऊ लागली. तैवान आणि हाँगकाँगबरोबर चीनचे संबंध तणावपूर्ण न ठेवता ते सौहाद्रपूर्ण ठेवल्यास, सर्वांनाच ते उपयुक्त ठरणार आहे, असे चीनमधील नेत्यांच्या लक्षात आले. एकीकरणाची ही प्रक्रिया सहजगत्या घडल्यास त्याचा परिणाम चांगला होऊ शकतो, असे मत बिजिंग विद्यापीठातील राजकीय तज्ज्ञ वँग योंग यांनी व्यक्त केले आहे. यासंबंधी गेल्या दोन वर्षांत घडलेल्या ठळक बाबी लक्षात घेण्यासारख्या आहेत. ●चीनमध्ये वास्तव्यास येणाऱ्या तैवानमधील अधिकाऱ्यांची संख्या तीन लाखांवरून पाच लाखांवर गेली

आहे. तसेच अमेरिकेतील विद्यापीठांपेक्षा चीनमधील विद्यापीठांमध्ये प्रवेश घेण्याला तैवानमधील अनेक विद्यार्थी प्राधान्य देत आहेत. ●आतापर्यंत तैवानची फार मोठी निर्यात अमेरिकेला करण्यात येत होती, ती आता चीनकडे वळविण्यात येत आहे. ●माहिती-तंत्रज्ञानाशी संबंधित अशा विविध उत्पादनांची निर्मिती करण्यात चीनने तैवानला मागे टाकले असले तरी, या उत्पादनातील किमान ७०टक्के वाटा तैवानमधील कंपन्यांचा असून त्याचे फायदे तैवानपर्यंत पोचले आहेत. हाँगकाँग आणि तैवान येथील अनेक कंपन्यांनी इलेक्ट्रॉनिक्सच्या क्षेत्रात, संपूर्ण जगात मोठी आघाडी मिळवली आहे. ●चीन, हाँगकाँग आणि तैवान यांच्यातील दळण-वळण सुलभ व्हावे, यासाठी मोठे पूल, रस्ते आणि जहाजांसाठी बंदरे बांधण्याचे प्रकल्प आखण्यात येत आहेत. ●आंतरराष्ट्रीय व्यापारासाठी 'चीनची खिडकी' म्हणून हाँगकाँगची भूमिका आता आंतरराष्ट्रीय बाजारात महत्त्वाची ठरते आहे.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत 'ग्रेटर चीन'चा प्रभाव जाणवत असून फक्त चार वर्षातच त्याचा जागतिक निर्यातीतील वाटा ६.९% वरून ९.६ %पर्यंत वाढला असून, तो जपानपेक्षा जास्त आहे, असे जागतिक बँकेने म्हटले आहे. २००७ पर्यंत तो, १३.७ टक्क्यांवर जाण्याची शक्यता आहे. तज्ज्ञांचा अंदाज असा आहे की, तोपर्यंत जागतिक व्यापार संघटनेतील नियमांप्रमाणे चीन व तैवान येथील बाजारपेठ खुली होऊन तेथील आयात-निर्यातीची उलाढाल अब्जावधी डॉलर्समध्ये होऊ शकेल, मग 'ग्रेटर चीन' हा





जपानपेक्षा दुपटीने जास्त व्यापारी शक्ती असलेला प्रांत ठरेल आणि अमेरिकेच्या तुलनेत त्याची खरेदीशक्ती दोनतृतीयांश असेल. युरोपीय आर्थिक समुदायाला (युरोपियन युनियन) फार लवकर (इ.स. २००७ पर्यंत) मागे टाकण्याची क्षमता 'ग्रेटर चीन'मध्ये असेल (वरील आलेख पाहावे). त्यावेळी त्याचे एकूण स्थूल राष्ट्रीय उत्पादन १२

ट्रिलियन डॉलर्स असेल. या 'ग्रेटर चीन'मध्ये, सध्या परदेशांत असलेल्या चिनी नागरिकांचा समावेश करण्यात आलेला नाही. हे परदेशस्थ चिनी नागरिक अजूनही मायदेशी परत जाण्यास उत्सुक आहेत. उदाहरणार्थ, गेल्या दोन दशकात परदेशात शिकण्यासाठी गेलेल्या चार लाखांवरील विद्यार्थ्यांपैकी सुमारे एक लाख चाळीस हजार विद्यार्थी मायदेशी परतले आहेत. या नागरिकांजवळ अत्याधुनिक ज्ञान, आणि परदेशी मिळविलेला अनुभव व पैसा ही भक्कम शिदोरी असते. शेनझेन भागात या नागरिकांनी अनेक कंपन्या स्थापन केल्या आहेत. शेनझेनचे मेयर यू यूजून यांना याचे श्रेय देण्यात येते. 'मार्क्सिस्ट स्टडीज' यात डॉक्टरेट मिळविलेले आणि व्यापार-उद्योगविषयक शिक्षण घेतलेले यू यूजून, चीनला आधुनिक बनविण्याची स्वप्ने पाहणाऱ्या सुधारक साम्यवाद्यांमध्ये मोडतात. त्यांचा आर्थिक सुधारणांना फार मोठा पाठिंबा आहे. तैवान आणि हाँगकाँग यांनी चीनबरोबर जावे असे प्रयत्न करणाऱ्यांमध्ये ते आघाडीवर होते.

चीनमधील अनेक प्रांतांमध्ये आर्थिक व औद्योगिक वाढीचे असे खास क्षेत्र विकसीत करण्यात येत आहे. (पुढील पानावरील नकाशा पाहावा) याशिवाय कोरिया व जपानमधील अनेक कंपन्या चीनबरोबर आर्थिक सहकार्य करण्यासाठी पुढे येत आहेत. अशा सर्व घटनांवरून, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका प्रमाणे युनायटेड स्टेट्स ऑफ चीन असे भविष्यात होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे मत काही तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. चीनला आर्थिक आघाडी मिळवून देण्यामागे चीनची आर्थिक सुधारणांकडे सुरू असलेली वाटचाल आणि ब्रिटिशांकडून हाँगकाँगचे चीनकडे झालेले हस्तांतर या दोन मोठ्या घटना कारणीभूत ठरलेल्या आहेत.

## संधीचा देश

'बंदिस्त देश' अशी चीनची असलेली प्रतिमा आता बदलत असून ती 'संधीचा देश' अशी होत आहे. त्यामुळे तैवान, हाँगकाँग, कोरिया, जपान इ. देशांमधून हजारो नागरिकांनी व्यवसायाच्या संधी शोधण्यासाठी चीनमध्ये प्रवेश केला आहे. चीनच्या लोकसंख्येच्या तुलनेत ही संख्या अल्पशी असली तरी नगण्य नक्कीच नाही आणि ती दिवसेंदिवस वाढतेच आहे. डलियानमध्ये जपानी नागरिक हजारोंच्या संख्येत आहेत. तर चीनच्या ईशान्य भागात कोरियातील नागरिक आढळतात. तैवान आणि हाँगकाँग येथील नागरिक तर मोठ्या संख्येने दिसतात. चीन हा अमेरिकेप्रमाणे स्थलांतरितांचा देश नाही. हॅन वंशाचे लोक येथे जास्त आहेत.



चीनमधील दक्षिण-पूर्व भागातील 'सिलिकॉन व्हॅली'

अर्थात, अमेरिकेप्रमाणे चीनला परकीयांसाठी दारे सताड उघडी ठेवायची नाहीत; पण नजीकच्याच परदेशींचे कौशल्य व ज्ञान यांचा उपयोग करून आपला फायदा करून घेण्याचे चीनने ठरविले आहे. कोरिया, जपान या देशांना हे कधीच जमले नाही. चीनने मात्र वेगळा मार्ग चोखाळायचे ठरवलेले दिसते. त्यामुळे चीनच्या दक्षिण-पूर्व भागात अमेरिकेतील 'सिलिकॉन व्हॅली' साकारू शकण्याची लक्षणे आहेत. ■■

*(संदर्भ - इंटरनेट, न्यूज फ्रॉम चीन - १ जानेवारी २००३, बिझिनेस वीक - ९ डिसेंबर २००२)*

# जर्मनीला हवी लोकसंख्येत वाढ !!

एक मध्यमवर्गीय घर... सकाळी साडेपाच-सहाला घड्याळाचा गजर ऐकताच सुस्ती व आळस झटकून चहा करता-करता स्वैपाकाची तयारी करणारी गृहिणी...एकीकडे मोठ्या दोघा मुलांना उठवून त्यांच्या शाळेची तयारी...तर तिसऱ्या व सर्वात धाकट्याला तयार करून पाळणाघरात पाठविण्याची तयारी करणारी आई...याशिवाय स्वतःचा व नवऱ्याचा नाश्ता आणि डबा तयार करून आपल्या ऑफिसला जाण्याच्या तयारीत असलेली ही करियर करणारी महिला.... हातातील काम घरातले, तर डोक्यात विचार ऑफिसच्या कामाचे... रोजचीच तारेवरची कसरत सांभाळत घड्याळाप्रमाणे धावणाऱ्या या गृहिणीचा नवरा समजूतदार... त्यामुळे या सर्व धावपळीत जमेल तशी मदत तो बायकोला करीत असतो. हे चित्र भारतातील सुशिक्षित मध्यमवर्गीय कुटुंबातील असेल, असे आपल्याला वाटणे साहजिक आहे. पण या चित्राचा कॅनव्हास भारत नव्हे तर तो आहे जर्मनी. फक्त पोळी-भाजीच्या ऐवजी ब्रेड सॅण्डविच, सूप असे पदार्थ असतील एवढाच काय तो फरक !

जर्मनीतील तरूण पती-पत्नी अशी तारेवरची कसरत करूनही दोन-तीन मुलांना चांगल्या प्रकारे वाढविण्याचा प्रयत्न का करताहेत ? तर जर्मनीतील लहान मुलांची संख्या फारच घटली आहे. जर्मनीतील लोकसंख्या जशी वयोवृद्ध होत आहे तशीच ती कमी होत आहे. १९९९मध्ये जर्मनीत ८,४६,००० मृत्यूंची नोंद झाली तर त्या तुलनेत फक्त ७,७१,००० बालके जन्माला आल्याची नोंद झाली. असेच प्रमाण राहिले तर या नजीकच्या भविष्यात, जर्मनीतील वीस वर्षाखालील तरूणांचे प्रमाण १५ टक्के आणि ज्येष्ठ नागरिकांचे प्रमाण ३८ ते ४० टक्के असे होण्याची शक्यता आहे.

जर्मनीतील कुटुंबव्यवस्थेत साधारणपणे एक किंवा क्वचितच दोन मुले होऊ देण्याकडे कल होता. असाच कल भविष्यात राहिला तर, जर्मनीतील सेवानिवृत्तीचे वय ७३ वर्षे करावे लागेल किंवा इतर देशांमधून काम करणाऱ्या लाखो व्यक्ती 'आयात' कराव्या लागतील. म्हणजे जर्मनीत मूळ जर्मन असलेल्यांची संख्या घटेल आणि जर्मनी हा स्थलांतरितांचा देश होईल. असे होऊ नये अशी काळजी घेणारे धोरणकर्ते आता, 'मुलांना जन्म द्या, त्यांच्या बालपणात रमून पालकत्वाचे आव्हान पेला आणि जर्मनीला वाचवा' असे आवाहन नागरिकांना करीत आहेत. उत्साही

नागरिक वरीलप्रमाणे कसरत करून सरकारी धोरणाला आपला पाठिंबा देत आहेत. सरकार व अनेक कंपन्या, कार्यालये देखील कर्मचाऱ्यांना मातृत्व रजा आणि पितृत्व रजा देऊन, तर कधी कामाच्या वेळा लवचिक ठेवून आपला पाठिंबा या धोरणाला देत आहेत. मुलांच्या शिक्षणासाठी, आरोग्यासाठी सरकारतर्फे सोयी-सवलतींचे प्रमाण वाढविण्यात येत आहे. सरकारच्या विविध योजना आणि मुलांच्या शिक्षणासाठी करदात्यांना दिलेल्या सवलतींमुळे होणारा खर्च हा कोट्यवधींच्या घरात जातो.

पूर्वी जर्मनीतही स्त्रियांनी कुटुंब सांभाळणे व पुरूषांनी घराबाहेर काम करणे अपेक्षित होते. पण कुटुंबव्यवस्थेचे हे परंपरागत चित्र आता बदललेले आढळते. स्त्रिया आता सुशिक्षित झाल्या आहेत, त्यांचा आत्मविश्वास वाढला आहे. त्यांना मुलेबाळे हवीत आणि करियरही हवे. त्यातच पुरुषांवर पालकत्वाची जाणीव विविध माध्यमांमधून बिंबवली जात आहे. त्यामुळे स्त्रियांना करियर करण्यास प्रोत्साहन मिळत आहे. ही झाली एक बाजू. पण याची दुसरी बाजू मात्र आर्थिक आहे. आज जर्मनीतील नोकरदार पती-पत्नी आणि त्यांची दोन-तीन मुले असे चार-पाच जणांचे कुटुंब लक्षात घेतले तर बेताचे राहणीमान ठेवूनही मुलांची अठरा वर्षे पूर्ण होईपर्यंत त्यांच्या संगोपनावरील व शिक्षणावरील खर्चाचे प्रमाण मोठे असते.त्यामुळे मुले हवी तर त्यांना वाढविण्यासाठी पैसाही हवा म्हणजे स्त्रियांनी नोकरी करणे आवश्यक होत चालले आहे. लोकसंख्येची वाढ व्हायला हवी, स्त्रियांनी नोकरीही करायला हवी, मुलांची आबाळ पण होऊ नये, इत्यादी विषयांच्या पार्श्वभूमीवर, चांगली पाळणाघरे आणि बालसंगोपन व कुटुंब या सामाजिक विषयाला जर्मनीतील राजकारणात चांगलेच महत्त्व मिळत आहे. देशातील, विविध पक्षांच्या व नेत्यांच्या कौटुंबिक धोरणाच्या चर्चा, प्रसारमाध्यमातून गाजत आहेत. ■■

*(संदर्भ -डॉईशलँड)*

प्रवासात व इतरत्रही बाटलीतून विकत मिळणारे 'मिनरल वॉटर' पिण्याचे प्रमाण सर्वत्र वाढते आहे. या बाटलीतील एक पेला पाण्यासाठी ग्राहक जी किंमत मोजतात, त्याच किंमतीत साध्या नळाचे दहा हजार पेले पाणी मिळू शकते.

# व्यापार संघटना व लघुउद्योगांमधील प्रदूषण

भारतीय अर्थव्यवस्था हळूहळू जागतिकीकरणाकडे पावले टाकीत असल्याने, जागतिक व्यापार संघटनेच्या नियम-बंधनातही अडकत आहे. याचा परिणाम भारतातील सर्वच उद्योगांवर व विशेषतः लघुउद्योगांवर फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. यासंबंधीचा एक विस्तृत लेख 'डाऊन टू अर्थ' या पाक्षिकात (१५ ऑक्टोबर २००२) प्रसिद्ध झाला आहे.

लघुउद्योगांचे क्षेत्र हे, भारताच्या उद्योगक्षेत्रात व्यापक पसारा असलेले क्षेत्र आहे. आकडेवारीच्या भाषेत सांगायचे झाले तर नोंदणीकृत लघुउद्योगांची संख्या अंदाजे ३४लाख असून, आणखी एवढेच लघुउद्योग असंघटित क्षेत्रात मोडतात. भारतातून क्रीडाविषयक ज्या काही वस्तूंची निर्यात केली जाते, त्यातील १०० टक्के वस्तू हे लघुउद्योग तयार करतात. लोकरीच्या कपड्यांच्या उत्पादनातील लघुउद्योगांचा वाटा ९५ टक्के, तयार कपड्यांच्या उत्पादनातील वाटा ९० टक्के, तंबाखू व बिडीच्या उत्पादनातील ७० टक्के वाटा, प्रक्रिया केलेल्या खाद्यपदार्थांच्या उत्पादनातील ६५ टक्के वाटा, विविध रसायने, औषधे आणि प्रसाधनांच्या उत्पादनातील ४४ टक्के वाटा हा लघुउद्योगांचा आहे. भारताच्या एकूण निर्यातीतील लघुउद्योगांचा वाटा ४५ ते ५० टक्के आहे. स्थूल राष्ट्रीय उत्पादनातील सात टक्के उत्पादन हे लघुउद्योगांकडून केले जाते.

याशिवाय लघुउद्योग हे रोजगारनिर्मितीस मोठ्या प्रमाणावर मदत करतात, असा दावा या उद्योगांचे समर्थक नेहमीच करीत असतात. ते खरेही आहे. १९९० ते २००१ या काळात लघुउद्योगांमधील रोजगार दरवर्षी वाढताच राहिला आहे. विविध वस्तू तयार करण्याच्या उत्पादन प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या रोजगारापैकी, ८६ टक्के रोजगार हा लघुउद्योगांमधून उपलब्ध झालेला आहे. वस्तूंमधील विविधता हे या उद्योगांचे वैशिष्ट्य म्हणता येईल. सात हजार पाचशेपेक्षा जास्त विविध वस्तू लघुउद्योगांमध्ये तयार होतात आणि ७०० हजार कोटी रूपये यात विविध प्रकारे गुंतलेले आहेत.

लघुउद्योगांची अशी मोठ्या प्रमाणावर वाढ होण्यामागे भारत सरकारची वेगवेगळी धोरणे सहाय्यभूत ठरली आहेत. साधारणपणे १९५० ते १९९७ या काळात ही वाढ

झाली. अगदी सुरूवातीला भांडवली गुंतवणुकीसाठी पाच लाख रूपये ही कमाल मर्यादा असणाऱ्या लघुउद्योगांची, हीच मर्यादा हळूहळू बरीच वाढली. १९९७ मध्ये ही गुंतवणूक मर्यादा तीन कोटीं होती. तसेच याच काळात अनेक वस्तूंचे उत्पादन हे लघुउद्योगांच्याच क्षेत्रासाठी राखून ठेवण्यात आले आहे.

लघुउद्योग सुरू करणे म्हणजे, शहरे व लहान गावे यांच्यात औद्योगिक विषमता कमी करणे, असेही समजले गेले. आज एक लाख लोकवस्ती असलेल्या गावात लघुउद्योग सुरू करण्यासाठी कोणत्याही प्रकारचा परवाना लागत नाही, तर एक लाखावर लोकवस्ती असलेल्या गावांमधील विशिष्ट औद्योगिक वसाहतींमध्ये लघुउद्योग सुरू करता येतात.

<u>जागतिक व्यापार संघटनेच्या अंतर्गत खुला व्यापार</u>

लघुउद्योगांसाठी राखून ठेवण्यात आलेली उत्पादने, आता देशी वा परदेशी मोठ्या कंपन्याही भारतात विकू शकताहेत, त्यामुळे लघुउद्योगांना फार मोठ्या स्पर्धेला सामोरे जावे लागत आहे.

१९९०च्या दशकात भारताने खुल्या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार करून, मुक्त व्यापाराला चालना देण्याचे धोरण स्वीकारले. यामुळे लघुउद्योगांसमोरचे चित्र एकदम पालटले. लघुउद्योगांमध्ये तयार होणाऱ्या अनेक लहान-मोठ्या वस्तू व उत्पादने यांच्यासंबंधीचे नियम बदलले. काही विशिष्ट वस्तू, यंत्रसामग्री, सुटे भाग हे आतापर्यंत लघुउद्योगांसाठी राखून ठेवण्यात आले होते, ते बंधन दूर करण्यात आले. १९९७-१९९८ या वर्षी अशी ४०६ उत्पादने, १९९८-१९९९ या वर्षी ८९६ उत्पादने आणि एप्रिल २००१मध्ये ७१५ उत्पादने लघुउद्योगांच्या कक्षेतून बाहेर काढण्यात आली.

लघुउद्योगांना विशेष संरक्षण मिळावे म्हणून, काही उत्पादनांच्या आयातीसाठी 'विशेष आयात परवाने' घ्यावे लागतील, असेही ठरविण्यात आले होते. तसेच आयात करण्यात येणाऱ्या उत्पादनांवरील जकातही कमी करण्यात आली आहे. त्यामुळे आज भारतीय बाजारपेठेत अनेक परदेशी कंपन्यांच्या ग्राहकोपयोगी वस्तू, देशी वस्तूंपेक्षा तुलनेने स्वस्त दरात उपलब्ध झालेल्या दिसताहेत. चीनमधील अशा वस्तूंनी तर बाजारपेठ भरू लागली आहे.

परदेशी उत्पादनांचा चांगला दर्जा व कमी किंमत यांमुळे ग्राहक त्या वस्तूंकडे खेचला जात आहे. या सर्व नव्या धोरणांमुळे लघुउद्योगांना जागतिक पातळीवरील स्पर्धेत उतरावे लागले आहे.

प्रदूषणाकडेही दुर्लक्ष

सरकारने या क्षेत्राला पुढे आणण्याचा प्रयत्न केला. कारण, भारतातील उद्योगक्षमता वाढणे हे आवश्यक होतेच. पण लघुउद्योगांची ही भरमसाठ वाढच आता सरकारसाठी व या उद्योजकांसाठी डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे; कारण औद्योगिक प्रदूषणातही लघुउद्योगांचा वाटा फार मोठा आहे. भारतातील औद्योगिक प्रदूषणापैकी ६५ टक्के प्रदूषण हे लघुउद्योग करीत आहेत. आणि जागतिक व्यापार संघटनेच्या नियम-बंधनांप्रमाणे, प्रदूषण करणारे उद्योग टिकविणे वा टिकणे हे अतिशय जिकिरीचे काम ठरणार आहे.

लघुउद्योगांच्या वाढीसाठी धोरणे आखताना भारतात सुरूवातीपासूनच प्रदूषणाचा, पर्यावरणाचा विचार फारसा करण्यात आला नाही. त्यामुळे जुने तंत्रज्ञान, त्यातून जास्त प्रमाणावर निर्माण होणारा कचरा, उत्पादन प्रक्रियेत हवा व पाणी दूषित होण्याचे प्रमाण आणि यांमुळे कामगारवर्ग व नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याचे प्रमाण, या बाबींचा विचार करता भारतीय उद्योग जागतिक पातळीवरील मागे पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जागतिक व्यापार संघटनेमार्फत औद्योगिक क्षेत्रातील प्रदूषणाचा व त्यामुळे खराब होणाऱ्या पर्यावरणाचा प्रश्न उचलून धरण्याचा प्रयत्न अमेरिकेसारखे देश करीत आहेत. व्यापार संघटनेच्या नियमांमध्ये, पर्यावरणाच्या नुकसानीने घडून येणारा परिव्यय (environmental cost of production) विचारात घेण्याचा हा प्रयत्न आहे. हा प्रयत्न यशस्वी झाला तर भारतातील अनेक लघुउद्योगांना गाशा गुंडाळण्याची वेळ येईल. भारतातील काही लघुउद्योगांकडून केवळ पाण्याचे होणारे प्रदूषण लक्षात घेतले तरी याचे गांभीर्य समजून येईल.

| उद्योग | दुषित होणारे पाणी (लाख लिटर दर दिवशी) |
|---|---|
| (१) इंजिनियरिंग | २१८५ |
| (२) पेपर अँड बोर्ड मिल | १०८७ |
| (३) कापड | ४५० |
| (४) रसायने | ६० |
| (५) टॅनरी | ५० |
| (६) साबण व डिटर्जन्ट | १० |
| (७) पेट्रोकेमिकल्स | १० |

जगात अनेक ठिकाणी पाण्याचा प्रश्न गंभीर होतो आहे. भारतही याला अपवाद नाही. अशा परिस्थितीत हे प्रदूषण अयोग्य ठरते. त्यामुळे प्रदूषण न करणारी किंवा अत्यल्प करणारी साधनसामग्री, कच्चा माल व उत्पादन प्रक्रिया वापरणे ही या उद्योगांची जबाबदारी ठरते. यासंदर्भात नागरिक व सरकार हळूहळू जागे होत असून अशा प्रदूषण करणाऱ्या उद्योगांविरूद्ध न्यायालयात तक्रारी करण्याचे प्रमाण वाढते आहे. त्यामुळेही लघुउद्योग कात्रीत सापडत आहेत.

लघुउद्योगांसाठी आणखीही एक अडचणीची ठरत असलेली बाब म्हणजे बौद्धिक संपदा कायदा (TRIPS - Trade Related Intellectual Property Rights). या कायद्याप्रमाणे परदेशी उत्पादनांचे तंत्र जाणून घेऊन, तीच उत्पादने भारतात तयार करणे शक्य होणार नाही. म्हणजे संबंधित उत्पादनाचे संशोधन भारतातच झालेले असणे गरजेचे ठरणार आहे. पण आजपर्यंत पाश्चिमात्य राष्ट्रांनी संशोधनात आघाडी मिळविल्याने हा कायदा त्यांना फायदेशीर ठरू शकेल, असे मत औद्योगिक कंपन्या व्यक्त करतात. परदेशी कंपन्यांशी स्पर्धा, वस्तूंचा दर्जा व किंमत, उत्पादनासंबंधी ग्राहकांच्या वाढत्या अपेक्षा, उद्योगामुळे समाजासमोर उभ्या ठाकलेल्या प्रदूषण व पर्यावरणविषयक समस्या, न्यायालयाच्या चकरा आणि जागतिक व्यापार संघटनेमुळे आता सरकारकडून संरक्षण न मिळणे व त्यातच व्यापार संघटनेच्या वाढत्या अटी, इत्यादींमुळे अडचणींच्या चक्रात सापडलेले लघुउद्योग, जर एकएक करीत बंद पडण्याची वेळ आली तर, भारतातील लाखो लोकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न उपस्थित होईल.

<u>उपाय काय ?</u>

लघुउद्योगांचे हे सर्व प्रश्न भारतीय समाजाचे म्हणजेच पर्यायाने भारत सरकार समोरील प्रश्न आहेत. या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी काय काय करता येणे शक्य आहे ? तर सर्वप्रथम सरकार व लघुउद्योगांनी एकत्रितपणे प्रदूषणाचा प्रश्न हाताळला पाहिजे. यासाठी शक्य तिथे सर्वत्र पर्यायी तंत्रज्ञान व ऊर्जा वापरली पाहिजे, हे करता येणे शक्य आहे. मात्र त्यासाठी नवनवीन संशोधन पुढे आणले पाहिजे. यासंबंधी पुढाकार घेण्याची तयारी उद्योगांनी, शास्त्रज्ञांनी आणि औद्योगिक विकास महामंडळांनी दर्शविली तर बरेच काही घडू शकेल. काही प्रमाणात असे प्रयोग सुरू झाले आहेत. लघुउद्योगांच्या अडचणी दूर करण्यासाठी व भारताच्या सर्वंकष औद्योगिक प्रगतीसाठी, नव्या औद्योगिक वातावरणात, लघुउद्योगांसंबंधीच्या धोरणांची पुन्हा एकदा बांधणी करण्याची वेळ आली आहे. ■■

# शास्त्रीय संगीत कुणासाठी ?

ऑक्सफोर्ड युनिव्हर्सिटी प्रेसने अलीकडेच, ज्यूलियन जॉन्सन यांचे 'हू नीड्स क्लासिकल म्युझिक ? कल्चरल चॉईस अँड म्युझिकल व्हॅल्यूज' या शीर्षकाचे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. शास्त्रीय संगीत कुणासाठी ? हा जॉन्सन यांनी उपस्थित केलेला प्रश्न, पाश्चात्य संगीताच्याच नव्हे तर भारतीय शास्त्रीय संगीताच्या संदर्भातही उपस्थित करावा, अशी परिस्थिती आहे.

असं म्हटलं जातं की १७व्या शतकातील एका कवीने चर्चमधील शास्त्रीय संगीताचा प्रगल्भ असा आविष्कार ऐकला, विविध सूरांचा सुरेख मेळ अनुभवला आणि असे उद्‌गार काढले की, 'हे संगीत ऐकून मला तर स्वर्गाचे दारच सापडल्याचा भास झाला.' तीनशे वर्षांनंतरचा आजचा एखादा कवी मात्र, बेथोवनची एखादी सिंफनी ऐकून नापसंतीची प्रतिक्रिया देईल, अशीच शक्यता अधिक. नाहीतरी प्रसिद्ध झाज् वाद्यनवाझ मिले डेव्हिस याने रॉक संगीताचे गोडवे गाताना, अभिजात संगीतास 'तीरस्करणीय'च ठरविले आहे. त्याचे म्हणणे असे की, पॉप संगीत त्वरित परिणाम घडवून आणते आणि त्यामुळेच ते अगदी जागतिक स्तरावर, भावनिक परिणामाचे एक निदान ठरले आहे.


ज्युलियन जॉन्सन हे एक शास्त्रीय संगीताचे गाढे अभ्यासक आणि स्वत: एक कलावंतही आहेत. 'शास्त्रीय संगीत कुणासाठी ? असा प्रश्न विचारून त्यांनी केवळ शास्त्रीय संगीताबाबत, समाजाच्या प्रचंड उदासीन वृत्तीवरच बोट ठेवलेले नाही तर, एकूणच अभिजात संगीत आणि उच्च स्तरावरील विविध कलांबाबत भाष्य केले आहे. या उच्च दर्जाच्या कलांच्या सखोलतेच्या जागी आजकाल फोफावत असलेल्या फॅशनेबल आणि भावनिक क्षोभ निर्माण करण्याला लेकप्रियता लाभते आहे, याविषयी त्यांनी खंत व्यक्त केली आहे. त्यांच्या मते, संस्कृतीचा मुख्य प्रवाह आता थिजला आहे आणि त्याची जागा घेतली आहे ती तरूणांच्या तात्काळ, तात्पुरत्या नि नवतेच्या मूल्यांनी. ज्या तऱ्हेचा व्यामिश्र नि जाणीवपूर्वक प्रतिसाद शास्त्रीय संगीतात अपेक्षित असतो तोच आता कालबाह्य, अनुपयुक्त आणि केवळ उच्चभ्रू मानला जात आहे.

हे ही खरे आहे की लोकप्रियतेच्या नादी लागून काही ठिकाणी शास्त्रीय संगीत हे उडत्या चालींचे पॉप संगीत आपलेसे करू लागले आहे; पण त्याचेही आवाहन संगीतापेक्षाही संपर्कसाधनांनाच अधिक आहे. काही लोक शास्त्रीय संगीत आपल्याला

आवडते असे सांगतात, ते सुद्धा त्या संगीताला असलेली प्रतिष्ठा, आणि त्यातून आपण उच्चभ्रू समाजातील आहोत असे दाखविण्याची संधी, यांनीच बऱ्याचदा आकर्षित झालेले असतात. शास्त्रीय संगीत ही खरोखर काय चीज आहे, ती कशा प्रकारची निर्मिती आहे, याकडे हे लोक डोळेझाकच करतात, असे जॉन्सन म्हणतात. आजच्या युगात, संगीताची वैश्विकता हाच मुळी एक प्रश्न आहे असे जॉन्सन म्हणतात. उदाहरणार्थ, रेकॉर्डिंगच्या सहजसुलभतेमुळे केवळ एक बटन दाबून तुम्ही उत्तम दर्जाचे संगीत हवे तेव्हा जवळ करू शकता, ऐकू शकता. पण, या छानशा सोयीचा एक विपरित परिणाम असा झाला आहे की, आता असे अभिजात संगीत केवळ आपल्या मूडला साजेसे असे पार्श्वसंगीत म्हणून लावून ठेवले जाते, आणि ऐकताना मध्येच अडथळे स्वीकारून, कसेही ऐकले जाते.

जॉन्सन यांचे म्हणणे केवळ वरवरचे नाही. केवळ करमणुकीच्या गाण्यांपेक्षा शास्त्रीय संगीताची नस वेगळी आहे. शास्त्रीय संगीत केवळ मेलडी, हार्मनी, ताल-लय यांचा आनंद देत नाही तर या गोष्टींकरवी जो भाव तो संगीतकार-कलावंत मनात जागृत करीत असतो, तो महत्त्वाचा असतो. एक प्रकारची भावनिक आणि बौद्धिक अशी मग्नता कलावंत आणि श्रोता परस्परांसमवेत अनुभवत असतात. आणि हीच मुळी पॉपसंगीत आणि पॉपसंस्कृती नाकारत असतात. ही बाब दुर्लक्ष करण्यासारखी खासच नाही. शास्त्रीय संगीतातील व्यामिश्रतेचा हा जो गुण आहे, तोच नाकारून केवळ संगीताने लोकांना भिजवून टाकणे आणि त्याकरवी माणसाचे माणूसपण सिद्ध करणे ही पॉपसंगीताची गोष्ट योग्य नव्हे.जॉन्सन यांची माणूसपणाची संकल्पनाही खूप वेगळी आहे. त्यांच्या मते, 'शारीर आणि बौद्धिक, भौतिक नि आध्यात्मिक, वस्तूरूप आणि त्याचे उच्च वैचारिक पातळीवरचे प्रस्थान यांमधून निर्माण होणारे ताण,' यातून माणसाचे माणूसपण व्यक्त होत असते. हजारो वर्षे माणूस, त्याच्या तार्किक जीवनात मेळ घालण्याचा प्रयत्न करीत आहे, आणि अभिजात संगीत त्यासाठी साधनभूत झाले आहे. पण त्याचवेळी आपण या शरीराच्या पलीकडे जाणारे, विचारांच्या, भावनांच्या कल्पनांच्या जगात नेणारे मार्ग शोधीत असतो. या मार्गांची गरज काही केवळ समाजातील उच्चभ्रू लोकांपुरती मर्यादित नाही. प्रत्येकाचीच ती नैसर्गिक गरज आहे. जीवनाचा अधिक सखोल अनुभव घ्यावा, विविध अंगांनी तो आत्मसात करावा ही प्रत्येकाची गरज आहे. मग शास्त्रीय संगीत कोणासाठी ? अर्थातच सर्वांसाठीच !

*(संदर्भ - द इकॉनॉमिस्ट, ११ जानेवारी २००३)* ■■



# शांततेच्या पाऊलखुणा
## नोबेलपुरस्कार विजेत्यांचे प्रयत्न

आण्विक, रासायनिक आणि जैविक शस्त्रास्त्रांनी भरलेले जग आज, एकविसाव्या शतकात, तिसऱ्या महायुद्धाच्या छायेत आहे. या पार्श्वभूमीवर शांततेचे नोबेलपुरस्कार मिळालेल्या अनेक मान्यवरांनी एकत्र येऊन जगात शांतता कशी नांदेल, याचा विचार सुरू केला आहे. या सर्व मान्यवरांची तिसरी आंतरराष्ट्रीय परिषद गेल्या वर्षी (ऑक्टोबर २००२) झाली. रोम येथे झालेल्या या परिषदेचे संयोजन करण्यात रशियाचे माजी अध्यक्ष मिखाईल गोर्बाचेव्ह आणि रोम शहराचे मेयर वॉल्टर मेल्ट्रोनी यांनी पुढाकार घेतला होता.

यावेळी झालेल्या भाषणातील, एक महत्त्वपूर्ण भाषण होते जोसेफ रॉटब्लॅट यांचे. जोसेफ रॉटब्लॅट (जन्म-१९०८,पोलंड) यांना १९९५मध्ये शांततेचे नोबेल मिळाले होते. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे अणुबाँबच्या निर्मितीत सहभाग असलेले ते एक शास्त्रज्ञ होते. अणुबाँब निर्मितीच्या 'मॅनहॅटन प्रोजेक्ट'चा निषेध करून त्याच्याबाहेर पडलेले ते एकमेव शास्त्रज्ञ होय. अल्बर्ट आईनस्टाईन आणि बर्ट्रांड रसेल यांनी अणुबाँबचा वापर न करण्याबद्दलचे आवाहन करणारा एक ठराव १९५५मध्ये मांडला होता. हा ठराव 'मॅनहॅटन रिझोल्यूशन' या नावाने प्रसिद्ध आहे. त्या ठरावावर सही करण्यासाठी आईनस्टाईन यांनी फक्त अकरा शास्त्रज्ञांना आमंत्रित केले होते, त्यातील एक शास्त्रज्ञ रॉटब्लॅट हे होते. त्या अकरा शास्त्रज्ञांपैकी रॉटब्लॅट हे एकमेव शास्त्रज्ञ आज हयात असून त्यांचे वय ९५ वर्षे आहे. या वयातही त्यांनी अखिल विश्वाचे चिन्तन करून, मानवजातीच्या कल्याणासाठी ज्या पोटतिडीकीने आणि तडफेने भाषण केले, ते जाणून घेण्यासारखे आहे. त्यांच्या भाषणातील काही महत्त्वाचे मुद्दे येथे मांडले आहेत. तसेच, या परिषदेच्या अखेरीस सर्व नोबेलपुरस्कारविजेत्यांनी ठरावाद्वारे केलेले आवाहनही येथे थोडक्यात देण्यात आले आहे.

**नजीकच्या भविष्यात आण्विक युद्धाची शक्यता ! : रॉटब्लॅट**

'अमेरिका आणि इराक यांच्यातील युद्ध कोणत्याही क्षणी सुरू होऊ शकते, अशा क्षणाकडे आपली वाटचाल चालू आहे. कोणत्याही परिस्थितीत इराकचे अध्यक्ष

सद्दाम हुसेन यांना पदच्युत करायचेच, असा चंग बुश यांनी बांधला आहे. सद्दाम हुसेन अण्वस्त्रांचा प्रयोग करू शकतात, असे आपल्याला सांगण्यात आले आहे.

मला आज अणुयुद्धाची शक्यता आढळते आहे; पण ती इराककडून नव्हे तर अमेरिकेकडून. कारण, अमेरिकेचे अण्वस्त्रांसह सर्वच क्षेत्रांतील 'सुपर पॉवर ' हे स्थान कायम राहिलेच पाहिजे, या एकमेव विचाराने प्रेरित झालेला गट बुश यांच्या प्रशासनात महत्त्वाचे स्थान मिळवून आहे. अमेरिकेच्या या धोरणावर मी टीका करतो आहे, अमेरिकेतील सर्वसामान्य नागरिकांवर नव्हे. कारण, अमेरिकेतील ७६ टक्के नागरिकांनी अण्वस्त्रांवर बंदी घालावी, असे मत व्यक्त केले आहे. मात्र अमेरिकेचे हे एकांगी धोरण ही खरी काळजीची बाब आहे. आर्थिक सत्ता आणि भांडवलशाही यांची काळी बाजू आता उघडकीस आली आहे. स्वार्थ आणि हाव जगण्याचा केंद्रबिंदू ठरतो आहे. अशा प्रकारे अमेरिकेच्या जीवनपद्धतीला संरक्षण देण्यासाठी लष्करी ताकद वाढविणे, हा उपाय शोधला जात आहे. या पार्श्वभूमीवर ११सप्टेंबर २००१ रोजी, अमेरिकेवर दहशतवाद्यांनी केलेला हल्ला हा, अमेरिकेच्या भूमीवर अमेरिकन नागरिक सुरक्षित नाही, याची जाणीव करून देणारा ठरला आहे. यानंतर अमेरिकेतील प्रशासन अधिकच आक्रमक धोरणे अवलंबित आहे.

पण अमेरिकेची मानसिकता पूर्वीपासून अशीच आक्रमक आहे. अमेरिकेने सर्वप्रथम अणुबाँब तयार केला तेव्हा हा अघोरी उपाय करून पाहू नये, अशी शास्त्रज्ञांची विनंती धुडकावून अमेरिकेचे तत्कालीन अध्यक्ष ट्रूमन यांनी जपानवर अणुबाँब टाकला. तेव्हाही अमेरिकेचे एक मंत्री जेम्स बायरन यांनी म्हटले होते की, अणुबाँबच्या वापरामुळे अमेरिकेचे जगातील स्थान बळकट होऊन रशियाला नमविण्यात ते उपयोगी ठरेल. अमेरिकेचे मित्रराष्ट्र असल्याखेरीज इतर कोणत्याही राष्ट्राने अण्वस्त्रसज्ज होऊ नये यासाठी, अमेरिका नेहमीच जागरूक राहील, अशी तेव्हापासून अमेरिकेची भूमिका होती, ती आज ५७ वर्षांनंतरही कायम आहे.

दरम्यान, अमेरिकेवर जैविक किंवा रासायनिक अस्त्रांचा उपयोग करण्यात आल्यास अमेरिका अण्वस्त्रांचा वापर करेल, अशी अमेरिकेच्या सरकारची भूमिका आहे तर अण्वस्त्रे तयार करून अमेरिका जगात शांतता प्रस्थापित करू पाहत आहे, असे 'न्यूक्लियर पोस्चर रिव्ह्यू' या नियतकालिकाच्या अंकात म्हणण्यात आले आहे.

अण्वस्त्रांबाबतच्या अमेरिकेच्या धोरणांमुळे शीतयुद्धाच्या काळात व त्यानंतरच्या काळात रशिया, चीन, भारत, पाकिस्तान अशी इतरही राष्ट्रे अण्वस्त्रसज्ज झाली

आहेत. कोणताही प्रश्न सोडविण्यासाठी युद्ध करणे आणि त्यातही अण्वस्त्रांचा वापर करणे असे धोरण असले तर, जगात शांतता कशी नांदणार ? अमेरिकेने आज इराकबरोबर युद्ध करून अण्वस्त्रांचा वापर केला तर, इतर अण्वस्त्रसज्ज राष्ट्रेही त्याचा वापर करण्यास मागेपुढे पाहणार नाहीत.

म्हणजे, काश्मीर प्रश्न सोडविण्यासाठी भारत किंबहुना भारतापेक्षा पाकिस्तानच त्याचा वापर आधी करेल अशी शक्यता वाटते. तसेच तैवानने स्वातंत्र्याचा प्रयत्न केला तर चीन तेथे लष्कर पाठविणार आणि तैवानला मदत करण्यासाठी अमेरिका हस्तक्षेप करणार, म्हणजे परत अणुयुद्धाची शक्यता वाढतेच. दहशतवादी संघटना देखील या शस्त्रास्त्रस्पर्धेत मागे राहणार नाहीत. म्हणजेच जग अणुयुद्धाच्या शक्यतेच्या किती जवळ येऊन पोचले आहे, याची आपल्याला कल्पना येईल.

आता, अणुयुद्ध टाळून अण्वस्त्रविरहित जग निर्माण करता येईल का, हा खरा आपल्यापुढील प्रश्न आहे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी काही मूलभूत तत्त्वांचा विचार व तशी कृती हे प्राधान्याने करावे लागेल. पहिले तत्त्व अर्थातच नैतिकता हे असेल. अण्वस्त्रांची विनाशाची क्षमता प्रचंड असूनही, अण्वस्त्रांचा वापर हा अनैतिक मानला जात नाही. यापुढे अण्वस्त्रांच्या निःशस्त्रीकरणासंदर्भात नैतिकतेचा मुद्दा प्रथम विचारात घ्यावा लागेल. अण्वस्त्रे प्रथम न वापरणे, म्हणजे नैतिकता नव्हे, हेही ध्यानात ठेवले पाहिजे. असा विचार करणारे हे अव्यवहार्य ठरेल, ही भूमिका मोडावी लागेल; कारण असा विचार करणाऱ्यांनाच त्यातील धोक्याची, विनाशाची संपूर्ण कल्पना आहे, असा त्याचा अर्थ होतो.

एखाद्या देशाजवळ अण्वस्त्रे असणे हे भयानक आहे, असे जेव्हा सांगितले जाते तेव्हा तसे सांगणाऱ्या देशाजवळही ती नसावीत, असे अपेक्षित आहे. इराकला जो न्याय लागू होतो तो अमेरिकेला लागू होत नाही, हे बरोबर नाही. जागतिक शांततेसाठी अमेरिकेजवळ अण्वस्त्रे असणे योग्य ही कारणमीमांसा कितपत योग्य आहे ? आज दैनंदिन जीवनातील घटनांपासून राष्ट्राराष्ट्रांच्या संबंधापर्यंत सर्वत्र दहशतवाद व हिंसाचार वाढतो आहे. हिंसाचाराच्या संस्कृतीच्या विळख्यात जग गुरफटत चालले आहे; शीतयुद्धाच्या कालखंडापासून हेच सुरू आहे. अशा परिस्थितीत तरूण पिढीवर काय वाईट परिणाम होत असतील ? ज्यांच्या हाती भविष्य सोपवायचे आहे, त्यांच्या मनामध्ये आपण शांततेची संस्कृती कशी रुजविणार ? पण अजूनही वेळ गेलेली नाही. मानवजातीच्या रक्षणासाठी अण्वस्त्रमुक्त जगाची निर्मिती आवश्यक आहे, या

नैतिक मूल्याला अमेरिकेसह अनेक राष्ट्रांतील नागरिक पाठिंबा देतील, अशी मला आशा आहे.

दुसरे तत्त्व आहे, समानतेवर आधारित असलेले व्यक्तिव्यक्तिंमधील आणि राष्ट्राराष्ट्रांमधील संबंध. हे तत्त्व आचरणात आणण्याचा प्रयत्न केला तर अनेक प्रश्नांची उकल होण्यास मदत होईल. तिसरे तत्त्व आहे, आंतरराष्ट्रीय कायद्यातंर्गत व्यवहार. अण्वस्त्रप्रसारबंदीचा कायदा करण्यात येऊनही अणुयुद्धाची शक्यता वाढते, हे योग्य नाही. या कायद्याप्रमाणे अमेरिका, चीन, फ्रान्स, रशिया आणि ब्रिटन या पाचही देशांनी अण्वस्त्रमुक्त होण्याचे मान्य केले आहे. पण या देशांची वागणूक ही, या आंतरराष्ट्रीय कराराच्या विरोधी आहे.

आज तंत्रज्ञानातील शोधांमुळे जग जवळ येऊन परस्परावलंबित्व वाढत आहे, अनेक पातळ्यांवर विविध देशांतील नागरिकांचे परस्परसंबंध वाढताहेत. अशा वेळी मानवतावादी दृष्टिकोणातून परस्परांविषयी आदर व समानता आणि आंतरराष्ट्रीय करार, नियम यांना अनन्यसाधारण महत्त्व मिळायला हवे. किंबहुना एक सुसंस्कृत जागतिक समाज या पायावरच उभा राहणार आहे.'

## नोबेल पुरस्कार विजेत्यांचे आवाहन

'जगातील वाढता हिंसाचार व युद्धाच्या वाढत्या शक्यता, आंतरराष्ट्रीय दहशतवाद, गरिबी व विषमता आणि पर्यावरणीय ऱ्हास हे जगासमोरील महत्त्वाचे व आव्हानात्मक प्रश्न असून त्यावर ताबडतोब उत्तरे शोधण्याची गरज आहे. शांतता, मानवतावाद आणि समानता याला महत्त्व देणारी नवी जागतिक व्यवस्था आकारात आणण्याची गरज आहे.

'राष्ट्राराष्ट्रांमधील प्रश्न सोडविण्यासाठी युद्ध व हिंसाचार या मार्गांचाच वापर प्रामुख्याने केला जाताना दिसतो, ही खेदाची व काळजीची बाब आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांचे लष्करीकरण रोखण्याची आवश्यकता आहे. यासाठी संयुक्त राष्ट्र संघासारख्या संस्था किंवा प्रादेशिक सुरक्षा परिषदांना अधिक महत्त्व देऊन त्यांद्वारे प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. शस्त्रास्त्रस्पर्धा थांबविणे, त्यांच्या व्यापारावर निर्बंध आणणे आणि युद्धाच्या शक्यता मोडीत काढणे हे काम प्राधान्याने करण्याची गरज आहे.

'मध्यपूर्वेतील तणाव शांततापूर्ण मार्गाने संपविण्यात यावा. यासाठी इस्रायली व पॅलेस्टिनी नागरिकांनी हिंसाचार प्रथम संपविला पाहिजे. इस्रायलची सुरक्षा महत्त्वाची आहे तसेच स्वतंत्र पॅलेस्टाईन राष्ट्राची मागणीही न्याय्य आहे. संघर्षाच्या सर्व बाजूंवर

लगेचच तोडगा काढता आला नाही तरी, प्रथम प्रश्नाचा केंद्रबिंदू सोडविता येईल का याचा विचार केला पाहिजे.

'इराकसंबंधी निर्माण झालेले प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेच्या ठरावांप्रमाणेच सोडविले पाहिजेत. यासंबंधी एकांगी कृती अमान्य करण्यात यावी. इराकमधील नागरिकांचे स्वातंत्र्य अबाधित राखून प्रश्न सोडवले पाहिजे.

'जोहान्सबर्ग येथे २००२मध्ये सातत्यपूर्ण विकासासंबंधीची आंतरराष्ट्रीय परिषद राष्ट्रसंघाच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आली होती. पण या परिषदेत जगातील गरिबी दूर करणे, पर्यावरणाचा ऱ्हास रोखणे याबाबत राष्ट्रांनी नेमकी कोणती उपाययोजना करायची याबाबतचा ठोस निर्णय जाहीर करण्यात आला नाही. पण आता यासंबंधी त्वरित पावले उचलण्याची गरज आहे. कारण, जगाची उत्तर व दक्षिण अशी झालेली विभागणी, ही धोक्याची ठरू शकते. त्यातून हिंसाचार व दहशतवादाच्या शक्यता अधिक वाढतात. मानवाच्या मूलभूत गरजांची पूर्तता होणे आणि आरोग्यविषयक सेवा त्यांना उपलब्ध होणे हेही आवश्यक आहे.

'जगात सर्वत्र पाण्याचा प्रश्न बिकट होत चाललेला आहे. यासाठीही सरकारांनी व संबंधित संस्थांनी वेळीच जागे होऊन लोकांना माहिती देऊन योग्य धोरणे राबविली पाहिजेत. नोबेलपुरस्कार विजेते आम्ही सर्व जण वरील उद्दिष्टांशी संबंधित विविध योजना आपापल्या ठिकाणी राबविण्याचा प्रयत्न करू. आम्ही आपापसातही संपर्क करून ही उद्दिष्टे गाठण्यासाठी प्रयत्नशील राहू.'

*(संदर्भ - इंटरनेट)* ■■

अमेरिकेने इराकच्या तेलसाठ्यांवर लक्ष ठेवूनच इराकवर युद्ध लादले, असे अनेकांचे मत असून, त्याची पुष्टी करणारी बाब अलीकडेच समोर आली आहे. तेलाच्या निर्यातीत, नायजेरिया हा जगात सहाव्या क्रमांकावर आहे. पण तेथील दोन जमातींमधील संघर्षामुळे अमेरिकेतील शेव्हरॉन, शेल आणि इतर बहुराष्ट्रीय कंपन्यांनी नायजेरियातील आपले उत्पादन थांबविले आहे. तेलउत्पादक कंपन्यांकडून होणाऱ्या प्रदूषणामुळे आपल्या मासेमारीतील उत्पन्नात घट झाली असून तेल कंपन्यांच्या नफ्यात आपल्याला मोठा वाटा मिळावा आणि आणखी राजकीय अधिकार मिळावे, अशी या जमातींची मागणी आहे.

*(संदर्भ - डाउन टू अर्थ १५ एप्रिल २००३)*

# जगाच्या पाठीवर.....

## कृत्रिम सौंदर्य आणि वंध्यत्व

जागतिकीकरणाच्या युगात विविध देशांमधील उत्पादनांना, अनेक देशांमधून बाजारपेठ मिळत आहे. किंबहुना अनेक कंपन्यांद्वारे, अशी बाजारपेठ मिळविण्याचे प्रयत्न, जाहिरातीं आणि इतर मार्गांनी मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहेत. विशेषतः अमेरिका व युरोपीय देश आणि बहुराष्ट्रीय कंपन्या अशा प्रयत्नांत आघाडीवर असतात असेही म्हटले जाते. या देशांमधील सौंदर्यप्रसाधनांच्या संदर्भात एक नवे संशोधन पुढे आले आहे. स्वीडन या युरोपीय देशातील प्रयोगशाळेत, अमेरिकेतील स्वयंसेवी संस्थेने केलेल्या संशोधनात, कृत्रिम सौंदर्यप्रसाधनांमधे वंध्यत्व वाढविणारी काही रसायने आढळली आहेत.

अशी रसायने पथॅलेटस् या गटात मोडतात. युरोपमधील बाजारपेठेत उपलब्ध असणाऱ्या अनेक कंपन्यांच्या उत्पादनांसंबंधी हे संशोधन करण्यात आले. यात सुवासिक अत्तरे (perfumes), विविध प्रकारची लोशन्स, क्रीम व हेअर स्प्रे अथवा जेल अशा ३४उत्पादनांचा समावेश होता. ज्या रसायनांमुळे, या प्रकारच्या उत्पादनांमधील सुवास टिकून राहण्यास मदत होते, तीच रसायने त्वचेतील रंध्रांमधून आणि श्वास आत घेण्याच्या प्रक्रियेतून रक्तप्रवाहात प्रवेश करतात. यामुळे शरीरातील पुनरूत्पादनाच्या शक्तीवर विपरित परिणाम होतो. उंदरांवर केलेल्या प्रयोगातून हे लक्षात आले आहे. उंदीर व मानव यांच्यातील जनुकीय साधर्म्य विलक्षण आहे, हे देखील संशोधनातून सिद्ध झाले आहे.

या संशोधनाच्या वेळी विविध उत्पादनांमध्ये पथॅलेटस्चे प्रमाण दर किलोमागे १ मिलिग्रॅम यापेक्षा कमी असणारे आणि यापेक्षा जास्त असणारे असे वर्गीकरण करण्यात आले होते. या निकषाप्रमाणे ८० टक्के उत्पादनांमध्ये पथॅलेटस् आढळले आणि निम्म्यापेक्षा जास्त उत्पादनांमध्ये अनेक पथॅलेटस् आढळले. तसेच प्रत्येक उत्पादनांतील किमान दोन टक्के भाग हा पथॅलेटस्चा होता. अतिप्रसिद्ध असणाऱ्या लिव्हर आणि ला-ओरियल या कंपन्यांच्या उत्पादनांतही ही पथॅलेटस् आढळली आहेत. अर्थात, हे

संशोधन चुकीचे आणि दिशाभूल करणारे आहे, असे मत 'युरोपियन कॉस्मॅटिक टॉईलेटरी अँड परफ्युमरी असोसिएशन'ने व्यक्त केले आहे. असे असले तरी कृत्रिम सुवासासाठी आणि सुंदरतेसाठी जगभरातील असंख्य नागरिक धडपडताहेत !!
*(संदर्भ - डाऊन टू अर्थ, जानेवारी १५, २००३)* ■■

## दारू आणि कायदा

जपानमध्ये गेल्या जूनपासून दारू पिऊन गाडी चालविणाऱ्यांच्या बाबतीत एक नवीन कायदा अंमलात आला आहे. या कायद्यानुसार, पिऊन गाडी चालविताना आढळल्यास पाच लाख येनपर्यंत (म्हणजे सुमारे दोन लाख रुपयांपेक्षा थोडेसे जास्त) दंड केला जात आहे. इतका मोठा दंड हेच केवळ या कायद्याचे वैशिष्ट्य नाही, तर अशा टॅक्सीतून जात असलेल्या प्रवाशालाही आता दंड द्यावा लागतो. म्हणजे केवळ पिणाराच नव्हे, तर प्यालेल्या ड्रायव्हरसहित प्रवास करणारा प्रवासीही, ड्रायव्हरला 'तपासून' घेत नसल्याने दोषी ठरतो. अलीकडे तेथील तरूणांच्या गप्पांमधून ड्रायव्हर आणि आतील प्रवासी यांनी अगदी दहा लाख येन इतका दंड भरल्याच्या गोष्टी चघळल्या जात आहेत.

या कायद्याचा काहीसा प्रभाव दिसू लागला आहे. गेल्या वर्षापेक्षा या वर्षी रस्त्यांवरील अपघातांत पाच टक्क्यांनी का होईना, पण, घट झाली आहे.

या कायद्याचा फटका मात्र अगदीच वेगळ्या लोकांना बसला आहे. जपानच्या कानागावा विभागातील ओडावारा हे एक निसर्गरम्य शहर आहे. टोकियोच्या नैऋत्येला अगदी जवळच हे शहर असून खाजगी मोटारी हेच इथले प्रमुख वाहन आहे. इथल्या सुंदर हॉटेलांमधून अनेक कुटुंबवत्सल लोक नेहमीच जेवायला येत असतात. छानसे जेवण आणि सोबत वाईनची बाटली. अगदी आनंददायक कार्यक्रम. पण आता, गाडी चालवतच घरी परतायचे असल्यामुळे, जेवणाबरोबर वाईनची मजा घेता येत नाही; आणि वाईन बरोबर नसेल तर, मुद्दाम हॉटेलमध्ये जाऊन जेवण घ्यायची तरी काय मजा ? आपले घरीच जेवलेले बरे !

या विचारांमुळे झालेय् काय की, हॉटेलांजवळचे कारपार्कस् बहुधा रिकामेच दिसू लागले आहेत. हॉटेलांच्या रोजच्या धंद्यावर विपरित परिणाम झाला आहे. आता ही हॉटेले विचार करताहेत की इथला गाशा गुंडाळून तिकडे, टोकियोच्या चिमोडा या गर्दीच्या वार्डमध्ये बस्तान बसवावे की काय याचा. कारण, त्या भागात एक वेगळाच

कायदा अंमलात आला आहे. तिकडे आता, रस्त्यांवरून धूम्रपान करीत जाण्यास सक्त मनाई केली आहे. त्यामुळे सिगारेट ओढण्याची तल्लफ भागविण्याकरता, हॉटेलमध्ये जाऊन बसणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. साहजिकच इथल्या हॉटेलांमधून गिऱ्हाईक वाढत चालले आहे. पण, ही सिगारेटवाली मंडळी केवळ एकच कॉफीचा कप घेऊन तो, सिगारेट संपेपर्यंत, पीत राहतील अशी शक्यता अधिक नाही का ? ■■

*(संदर्भ - द इकॉनॉमिस्ट, ११ जानेवारी २००३)*

## शतकाची खेळी : अमेरिकेची

जगातल्या प्रत्येकच देशात इ.स. १९०० ते इ.स. २००० या शतकभराच्या अवधीत अनेक बदल झाले. या सबंध कालात अमेरिकेचे जगामधील वर्चस्व वाढत गेले. आज जगातील अनेक युद्धांशी अमेरिकेचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध आहे. १९०४ साली टेडी रूझवेल्ट यांनी पनामा कालवा खोदण्याचे काम सुरू केले आणि त्यातूनत १९०७ साली युद्ध नौकांची पलटण अमेरिकेबाहेर पडली. दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरच्या टप्प्यात अमेरिकेने दोस्त राष्ट्रांच्या बाजूने प्रवेश केला, हायड्रोजन बाँबचा जपानवर पहिला प्रयोग केला आणि युद्धाची अखेर घडवून आणली. पण, कोरिया नि व्हिएतनाम ही दोन युद्धे मात्र अमेरिकेला नामोहरम करणारी ठरली. जागतिक मंदीचाही मोठा फटका अमेरिकेला सोसावा लागला.

या शतकभराच्या कालावधीतील अमेरिकेच्या अर्थ नि समाजव्यवस्थेत घडून आलेले काही बदल मात्र मनोरंजक आणि माहितीपूर्ण वाटतील, असे आहेत. १९०० साली असलेली अमेरिकेची केवळ ७ कोटी ६० लाख ही लोकसंख्या शतकभरात जवळजवळ चौपट म्हणजे २८ कोटी १० लाख इतकी झाली. अमेरिकेतील काही राज्यांत - न्यूमेक्सिको, कोलोरॅडो, व्योमिंग, मोंटाना इ. - १९०० साली लोकसंख्येतील जेमतेम ५ टक्के लोक येथे राहात होते. आता मात्र तिथे लोकसंख्येतील २३ टक्के लोक राहतात. शतकाच्या सुरूवातीला न्यूयॉर्क हे ६० लाख लोकवस्ती असलेले सर्वात मोठे राज्य होते. आता मात्र त्याचा क्रमांक १९वा आहे.

याउलट केवळ १५लाख वस्ती असलेले कॅलिफोर्निया राज्य, आता ३ कोटी ४० लाख लोकांसह पहिल्या क्रमांकावर आहे. गंमतीदार भाग असा की १९०० साली अमेरिका हे 'मुलांचे ' राष्ट्र होते. दर तीन अमेरिकनांमागे एक जण १५ वर्षांच्या

आतील होता. आता पाच जमांत एक जण 'लहान' आहे. पूर्वी अमेरिकेची निम्मी लोकसंख्या २३च्या खाली नि निम्मी वर होती. आता हे सरासरी वय (मिडियन एज) ३५वर गेले आहे. १९००च्या सुमारास अमेरिकेतील ४५ टक्के कुटुंबामधून पाचपेक्षा अधिक व्यक्ती होत्या आणि केवळ ५ टक्के कुटुंबे, एक व्यक्ती कुटुंबे होती. आता मोठ्या कुटुंबांचे प्रमाण ११ टक्क्यांपर्यंत घटले आहे तर एक व्यक्ती कुटुंबांची संख्या २६ टक्क्यांवर गेली आहे. या कालावधीतील मोठा बदल म्हणजे अमेरिकेतील आयुष्यमान ४७ वरून ७७वर गेले आहे.

आज मोटारींचा देश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अमेरिकेत १९००मध्ये फक्त ८०००मोटारी होत्या; दहा मैल रस्ते सुद्धा काँक्रिटचे नव्हते. रेडिओ अवतरायला अजून वीस वर्षे अवकाश होता. चलचित्रपटही अस्तित्वात नव्हते. टेलिफोन मात्र जन्माला आले होते; पण त्याचे प्रमाण खूपच कमी म्हणजे दर ६६ माणसांमागे एक टेलिफोन, असे होते. आज मोठ्या शहरांचा प्रदेश म्हणूनही अमेरिका ओळखला जातो. पण, १९००साली अमेरिकेची ७५ टक्के लोकसंख्या ही छोट्या गावांतून आणि शेतांवरून राहत होती.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला ब्रिटन ही जगातील महासत्ता होती, तर विसाव्या शतकाच्या अखेरीपर्यंत रशिया ही एक महासत्ता होती. जपान, जर्मनी हे देश जगात आर्थिक सत्ता म्हणून डोळ्यात भरू लागले होते. पण, एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर मात्र अमेरिकेने बाजी मारली आहे.

अमेरिका हे अनेक राष्ट्रांमधील तरूणांना आर्थिक व बौद्धिक प्रगतीसाठी आकर्षक वाटत आहे. एक मोठे लोकशाही राष्ट्र, व्यक्तीस्वातंत्र्यवादी राष्ट्र तरीही बाह्य जगात एक युद्धखोर राष्ट्र म्हणून अमेरिकेची प्रतिमा आहे.

■■

*(संदर्भ - रॉबर्ट सॅम्युअलसन यांच्या 'स्पिरिट ऑफ अमेरिका' हा न्यूजवीक १३ जानेवारी २००३ मधील लेख)*

हळदीला पिवळाधम्म रंग देणाऱ्या घटकामुळे म्हणजे करक्युमिनमुळे दारू पिऊन होणाऱ्या यकृताच्या आजारावर उपचार करता येणे शक्य आहे, असे संशोधनातून आढळले आहे. याचा अर्थ दारू पिऊन यकृत बिघडले तरी चालेल असा नव्हे, असेही संशोधकांनी स्पष्ट केले आहे.

## भारत व शिक्षणाच्या सोयीसुविधा !!

भारतातील शिक्षणाची दशा आणि दिशा हा नेहमीच चर्चेचा विषय ठरलेला आहे. देशातील शिक्षणाच्या दर्जाविषयी तज्ज्ञांमध्ये विविध मते असली तरी, १९९८च्या अखेरीपर्यंत भारतात शिक्षण देणाऱ्या हजारो शाळा व महाविद्यालये उभी राहिली आहेत. बालशिक्षण देणाऱ्या ४१,७८८ शाळा आणि प्राथमिक शिक्षण देणाऱ्या सहा लाख दहा हजार सातशे त्रेसष्ठ शाळा येथे आहेत, अनेक महाविद्यालये आहेत, तरी विविध प्रकारच्या शैक्षणिक संस्थांची मागणी भारतात आजही आहे. केंद्र सरकारच्या शिक्षण विभागाच्या नोंदीनुसार भारतातील शैक्षणिक संस्थांची आकडेवारी अशी -


| संस्था | एकूण संख्या |
|---|---|
| बालशाळा | ४१,७८८ |
| प्राथमिक शाळा | ६,१०,७६३ |
| माध्यमिक शाळा | १,८५,५०६ |
| माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा | ७६,२३० |
| उच्च माध्यमिक | २६,४९१ |
| महाविद्यालये | |
| पदवीपूर्व | ४,३७९ |
| कला, वाणिज्य व विज्ञान | ७,१९९ |
| अभियांत्रिकी व तंत्रशिक्षण | ४५८ |
| वैद्यकीय व आयुर्वेदिक | ७६९ |
| पॉलिटेक्निक | १,०५१ |
| विद्यापीठे | २२९ |

*(संदर्भ - इकॉनॉमिक टाइम्स )*

## शाळा आहेत पण विद्यार्थी कुठे ?

भारतात शिक्षणाच्या सोयी असल्या तरी शिक्षणाची गरज असलेल्या सर्वांपर्यंत त्या पोचल्या आहेत का याविषयी शंका आहे. तसेच मिळणारे शिक्षणही पदरात न

पाडणारेही अनेक आहेत. अर्थात याची कारणे फार वेगळी आहेत, त्या कारणांमध्ये जाण्याचे येथे प्रयोजन नाही. प्राथमिक व माध्यमिक शाळेत जाणाऱ्या मुलांची टक्केवारी भारतात फारच कमी आहे. म्हणजेच आजही प्राथमिक शिक्षणापासून लाखो मुले-मुली वंचितच आहेत. याविषयीची भारताची आणि इतर काही देशांची टक्केवारी खालील आलेखाद्वारे मांडण्यात आली आहे.





*(संदर्भ -वर्ल्ड बँक , इकॉनॉमिक टाइम्स )*

## भारतात बेरोजगारी वाढलेलीच !

गेल्या दशकात (१९९१ ते २००१) भारतातील बेरोजगारी ३ कोटी ६३ लाख पासून ४ कोटी २ लाख एवढी वाढली आहे. आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने (International Labour Organization - ILO) ही माहिती जाहीर केली आहे. याच काळात भारतातील सुशिक्षित बेरोजगारांच्या संख्येतही वाढ झाली. सध्या एकूण बेरोजगारांपैकी १३ टक्के बेरोजगार हे पदवीधर किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षण घेतलेले आहेत.

## प्रौढ निरक्षरांच्या संख्येत भारत आघाडीवर

जगातील एकूण निरक्षरांपैकी निम्मे निरक्षर भारत व चीन या दोन देशांमध्ये मिळून आहेत. जगात ८ कोटी ६२ लाख निरक्षर असून त्यातील ३४ टक्के भारतात आहेत.




*(संदर्भ - EFA Global monitoring Report २००२,इकॉनॉमिक टाइम्स)* ■■

## पाण्याचा प्रश्न

पिण्याच्या पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस बिकट होत जाणार आहे, असे यासंबंधित विविध अभ्यासांमधून सूचित होत आहे. इ.स. २०५०पर्यंत ६० देशांमधील कोट्यवधी लोकांना पाण्याची चणचण मोठ्या प्रमाणावर जाणवणार आहे. पाणी दूषित होण्याचे प्रमाण दरवर्षी वाढतच आहे. दर दिवशी किमान लाखो टन कचरा पाण्यात सोडला जातो. प्रदूषित झालेले १ लिटर पाणी हे, चांगले असलेले किमान ८ लिटर पाणी प्रदूषित करते. दरवर्षी, पिण्याचे पाणी प्रदूषित होऊन हजारो लोकांना प्राणास मुकावे लागते आहे. आशिया खंडातील नद्यांमध्ये मानवी विष्ठा मिसळण्याचे प्रमाण जास्त असून या पाण्यात बॅक्टेरिया असण्याचे प्रमाण जगातील इतर नद्यांच्या तुलनेने तिपटीने जास्त आहे. पाण्याच्या वाटपाबाबतही असमानता आहे. विकसित देशांमधील एका मुलामागे खर्च होणारे पाणी हे अविकसित देशांमधील मुलांसाठी खर्च होणाऱ्या पाण्यापेक्षा तीस ते पन्नास पट जास्त असते. ■■

*(संदर्भ - वर्ल्ड वॉटर डेव्लपमेंट रिपोर्ट)*

## अर्थबोधपत्रिका भेट अंक योजना

अर्थबोधपत्रिका या वैचारिक उपक्रमात सहभागी झाल्याबद्दल आपले अभिनंदन व आभार. यात आपल्यासारख्या अनेकांचा सहभाग वाढावा, यासाठी आम्ही आपल्याकडून एक छोटी मदत मागत आहोत. अर्थबोधपत्रिका आणखी काही उत्सुक व्यक्तींपर्यंत पोचण्यासाठी आमची योजना अशी की, आपण आपल्या परिचयातील अशा व्यक्तींची नावे व पत्ते पोस्टकार्डने किंवा आंतरदेशीय पत्राने आम्हाला कळवावीत. म्हणजे त्यांना आम्ही एक अंक भेट म्हणून पाठवू. अंक आवडल्यास त्यांना सभासद होता येईल.

## अर्थबोधपत्रिकेच्या जिज्ञासू सदस्यांसाठी सुवर्णसंधी

भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी या संस्थेच्या संदर्भ ग्रंथालयात सामाजिक, आर्थिक, राजकीय व इतर विषयांवरील सुमारे बारा हजारावर ग्रंथ आहेत. हे ग्रंथालय अर्थबोधपत्रिकेच्या सदस्यांना विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. अधिक तपशीलासाठी व्यवस्थापकांकडे चौकशी करावी.

---

## अर्थबोधपत्रिका

दिनांक :

**सभासद होण्यासाठी करावयाचा अर्ज**

मला/आमच्या संस्थेला अर्थबोधपत्रिकेचे सभासद म्हणून माहे ........ पासून नोंदवून घ्यावे. एकूण बारा अंकांची वार्षिक वर्गणी १००/-रुपये परदेशस्थ वाचकांसाठी $२०फक्त) डिमांड ड्राफ्ट/चेक/मनीऑर्डर/पोस्टलऑर्डरने / रोख पाठवीत आहे. (फक्त पुण्याच्या बँकेवरील चेक पाठवावेत.) चेक/ड्राफ्टचा तपशील -

____________________

अंक पाठविण्यासाठी नाव व पत्ता ____________________

____________________

____________________

जिल्हा ____________ पिन - ____________

सूचना : चेक / ड्राफ्ट 'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी, पुणे' या नावाने पाठवावेत. सभासदत्वाच्या नूतनीकरणासाठी कृपया पत्रिकेच्या वेष्टनावरील आपला सभासद क्रमांक अवश्य कळवावा.

# व्हेनेझुएलातील घड्याळे मागे !!

आश्चर्य वाटेल पण ही गोष्ट खरी आहे की, गेल्या दोन वर्षांपासून व्हेनेझुएला या देशातील घड्याळांचा प्रवास मागे-मागेच चालू आहे. म्हणजे असे की दर मिनिटागणिक या देशातील नवतंत्रज्ञानयुक्त घड्याळे १५० सेकंद मागे पडताहेत. या देशातील इतर नवतंत्रज्ञानयुक्त सर्व वस्तू मात्र आपले ठराविक कार्य पार पाडीत आहेत. मग फक्त घड्याळांनाच काय झाले असावे ?

घड्याळांचा हा प्रश्न फेब्रुवारी २००१ मध्ये निर्माण झाला. यामागे नवतंत्रज्ञानाशी संबंधित एक गंमतशीर घटना घडली.

झाले असे की, २०००-२००१ या काळात, पुरेसा पाऊस न झाल्याने व्हेनेझुएलात दुष्काळ निर्माण झाला. त्यातच व्हेनेझुएलाच्या सर्वात मोठ्या जलविद्युत प्रकल्पाला पाणीपुरवठा करण्यात येणाऱ्या एका नदीचे पाणी आटले. मग नागरिकांना सततच्या वीजकपातीला सामोरे जावे लागले. तेव्हा नागरिकांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन वीजकपात कमी कशी करता येईल याचा विचार तेथील प्रशासन करू लागले. उपाय म्हणून व्हेनेझुएलाच्या या मोठ्या जलविद्युत प्रकल्पाच्या मुख्य अधिकाऱ्यांनी वीजपुरवठा करण्यासाठी त्या प्रकल्पातून मिळणाऱ्या वीजपुरवठ्यातील फ्रिक्वेन्सी जरा कमी केली. त्यामुळे 'इलेक्ट्रॉनिक क्वाट्र्झ' या तंत्रज्ञानावर चालणाऱ्या घड्याळांमधील क्रिस्टलला मिळणारे व्हायब्रेशन्स कमी प्रमाणात मिळू लागले आणि ही सर्व घड्याळे मागे पडू लागली. आता पुन्हा पाऊस पडून दुष्काळ संपेपर्यंत हा प्रश्न राहण्याची शक्यता आहे.

पण येथील नागरिकही हुश्शार! कामाचा खोळंबा होऊ नये व आपण जगाच्या मागे पडू नये यासाठी त्यांनी दर तीन महिन्यांनी आपली घड्याळे जगाच्या घड्याळाप्रमाणे लावून घेण्याची सवय केली. नोकरी करणाऱ्या एका महिलेने मात्र नामी उत्तर शोधले. तिच्या मते, "तुम्ही कार्यालयात काही मिनिटे उशीरा पोचलात आणि इतरही सर्व त्या वेळेत पोचले तर कुणालाच उशीर झाला नाही असे मानले जाऊ शकते. त्यामुळे घड्याळे मागे पडली तरी फारसा त्रास होत नाही."

■■

(संदर्भ - डाऊन टू अर्थ, ३१ मार्च २००३)

RNI, New Delhi, Ref. MAHMAR22654/13/1/2002TC
Dated 23-1-2002 & Declaration Ref. P.H.M./S.R./61/VIII/2003

# भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी

**स्थापना** ◘'इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी' ही संस्था प्रसिध्द अर्थतज्ज्ञ वि. म. दांडेकर यांनी १९७० साली स्थापन केली.

**उद्दिष्टे** ◘भारताच्या सामाजिक, राजकीय, व आर्थिक समस्यांचा अभ्यास व संशोधन करणे. ◘अभ्यासक, संशोधक, सामाजिक व राजकीय कार्यकर्ते, शासनकर्ते, उद्योजक, उद्योग व्यवसायातील वरिष्ठ अधिकारी व सामान्य जनता यांना वरील विषयाचे ज्ञान व माहिती देणे. ◘इंग्रजी व इतर भारतीय भाषांमध्ये संदर्भित विषयांवरील साहित्य / पत्रके / पुस्तिका योग्य नमुन्यांत तयार करुन प्रकाशित करणे.

**उपक्रम** ◘संस्थेतर्फे १९८९सालापासून, भारताच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय विचारांना वाहिलेले एक इंग्रजी त्रैमासिक (जर्नल ऑफ इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी) चालवले जाते. ◘संस्थेतर्फे वेळोवेळी, विविध विषयांवर अभ्यासशिबिरे, कार्यशाळा, चर्चासत्रे, गटचर्चा यांसारखे कार्यक्रम आयोजित केले जातात. ◘अलीकडे, संस्थेतर्फे सर्व सामान्य माहिती विभिन्न वाचकांना देणाऱ्या, वेगवेगळ्या विषयांवरील छोट्या पुस्तिका तयार करून वितरित करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

**- संस्थेचे नियंत्रण मंडळ -**

•विकासचंद्र चित्रे •मृणालदत्त चौधरी •कुमुदिनी दांडेकर
•द.ना. धनागरे •आनंद नाडकर्णी •मनोहर भिडे •नीळकंठ रथ
•के. एन्. राज •व्ही.एम्.राव •दि.चं. वधवा
•ए. वैद्यनाथन •सत्यरंजन साठे •रामदास होनावर

**इंडियन स्कूल ऑफ पोलिटिकल इकॉनॉमी (भारतीय अर्थविज्ञानवर्धिनी) पुणे या संस्थेच्या मालकीचे हे मासिक, मुद्रक व प्रकाशक रामदास होनावर यांनी एस. के. प्रिंटर्स, परज अपार्टमेंट, २०५ शनिवार पेठ, पुणे - ४११०३० येथे छापून 'अर्थबोध', ९६८/२१-२२, सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११०१६ येथून प्रकाशित केले. संपादक : रमेश पानसे**